रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १९९ । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

## डिलिव्हरी कर्मचारी जाणार संपावर

**नवी दिल्ली :** झोमॅटो, स्विगी, झेप्टो, ब्लिंकिट, अमेझॉन आणि फ्लिपकार्ट येथील डिलिव्हरी कामगार संपाची योजना आखत आहेत. इंडियन फेडरेशन ऑफ ॲप-बेस्ड ट्रान्सपोर्ट वर्कर्स आणि तेलंगणा गिग अँड प्लॅटफॉर्म वर्कर्स युनियन या आंदोलनाचे नेतृत्व करत आहेत. प्लॅटफॉर्म कंपन्यांच्या कमाईत डिलिव्हरी कामगारांच्या दुर्दशेबद्दल वाढती चिंता या निषेधातून दिसून येते. इंडियन फेडरेशन ऑफ ॲप-बेस्ड ट्रान्सपोर्ट वर्कर्स आणि तेलंगणा गिग अँड प्लॅटफॉर्म वर्कर्स युनियन यांनी बिघडत्या कामाच्या परिस्थिती आणि घटत्या वेतनाच्या निषेधार्थ हा संप पुकारला आहे.

रायगड, शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## समुद्रातील खारे पाणी भातशेतीत

**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील खोपटा, आवरे, पिरकोन, गोठवणे, चाणजे, वशेणी, पुनाडे, विंधणे, मोठी जुई ग्रामपंचायत हद्दीतील खाडी किनाऱ्यावरील बांधबंदिस्तीच्या कामांकडे खारभूमी सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने त्या शेतजमिनीत समुद्राचे खारे पाणी शिरत आहे. त्यामुळे हजारो एकर शेतजमीन नापीक होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तरी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण येथील अधिकाऱ्यांनी बांधबंदिस्तीची कामे मार्गी लावावीत, अशी मागणी शेतकरी करत आहे.

उरण परिसरातील पुर्व विभागातील व चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधन भातशेती आहे. परंतु गेली अनेक वर्षे खाडी किनाऱ्यावरील बांधबंदिस्तीची कामे न केल्याने समुद्रातील खारे पाणी भात शेतीत शिरत आहे. त्यात जेएनपीए व करंजा बंदरात या अगोदर करण्यात आलेल्या दगड मातीच्या भरामुळे समुद्रातील उधाणाचे पाणी हे सातत्याने भातशेतीत शिरत आहे.

> खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण येथील विजय पाटील कार्यकारी अभियंता यांच्याकडे उरण तालुक्यातील बांधबंदिस्तीची कामे मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. परंतु निधी उपलब्ध होऊ न शकल्याने ती कामे रेंगाळत पडली आहेत. तरी शासनाने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आहे.
>
> – सत्यवान भगत, तालुकाअध्यक्ष, मनसे, उरण

> उरण तालुक्यात काही अंशी बांध दुरुस्तीची कामे सुरू आहेत. तसेच खोपटा परिसरातील खाडीकिनाऱ्यावरील बांधबंदिस्तीची कामे मार्गी लावण्यासाठी राज्य व केंद्र शासन स्तरावर सतत प्रयत्न केले जात आहेत. लवकरच ही कामे मार्गी लागतील.
>
> – खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण

एकंदरीत शेतकऱ्यांचे उपजीविकेच साधन धोक्यात येत असताना,शासन पुन्हा एकदा चाणजे •> पान २ वर

## वे|ध|क

### भरधाव कार हॉटेलमध्ये शिरली

**महाड :** महाड-रायगड मार्गावर महाडकडे येणाऱ्या झायलो कार चालकाने कुत्र्याला वाचवण्याच्या प्रयत्नात ब्रेक दाबला असता कार अनियंत्रित होऊन रस्त्याकडे असलेल्या घरासमोरील शेडवर जाऊन पलटी झाली. या अपघातामध्ये घरासमोरील शेडचे अतोनात नुकसान झाले असले तरी घरमालकाने महाड तालुका पोलीस ठाण्यात अद्याप तक्रार दाखल केली नाही. महाड-रायगड मार्गाचे काम सुरू असून येथील अक्षय कंन्स्ट्रक्शनच्या इंजिनीयरला आणण्यात निघालेल्या झायलो कारच्या चालकाने समोर आलेल्या कुत्र्याला वाचवण्याच्या प्रयत्नात ब्रेक दाबला आणि गाडी अनियंत्रित होऊन •> पान २ वर

### कर्नाटक चित्रदुर्ग येथील घटना

**चिकोडी :** कर्नाटकातील चित्रदुर्ग जिल्ह्यात गुरुवारी पहाटे भीषण अपघात घडला. एका खासगी स्लीपर बसची ट्रकशी टक्कर झाली. या अपघातातुळे स्लीपर बसने पेट घेतला. या अपघातात किमान १७ जणांचा मृत्यू झाला असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. बस बंगळुरूहून शिवमोगाला जात होती. स्लीपर बसला ३०० किलोमीटरहून अधिक प्रवास करावा लागणार होता. विरुद्ध दिशेने येणाऱ्या कंटेनरने दुभाजक उडवून बसला धडक दिली. यामुळे डिझेल टाकीचा स्फोट झाला. मोठी आग लागली. बस बंगळुरहून गोकर्णकडे जात होती तर कंटेनर हिरियुरहून बंगळुरूला जात होता.

### लाडक्या बहिणींची धावपळ

**रायगड :** 'लाडकी बहीण योजने' च्या माध्यमातून महिलांना दिलासा मिळाला आहे. शहर तथा ग्रामीण भागातील महिलांची आर्थिक अडचणीतून जर सुटका झाली असली तरी ई-केवायसी करण्यासाठी सहा दिवस उरल्याने महिलांची धावपळ उडत आहे. लाडकी बहीण योजनेतील हजारो लाभार्थ्यांवर अपात्रतेची टांगती तलवार आहे. या योजनेतील पात्र महिलांसाठी ३१ डिसेंबरपर्यंत ईकेवायसी करणे राज्य सरकारे नबंधनकारक केले होते. या योजनेचा रायगड जिल्ह्यातील बहिणींनी लाभ घेतला आहे. मात्र, काही महिलांनीच ही प्रक्रिया पूर्ण केली असल्याने हजारांहून अधिक लाभार्थी अपात्र ठरण्याच्या दाट शक्यता आहे. त्यामुळे आता शेवटचा एक आठवडा •> पान २ वर

### तळीरामांवर पोलिसांची नजर

**रायगड :** नाताळ सण, आगामी नववर्षाचे स्वागतासाठी रायगड जिल्ह्यामध्ये वाहतूक पोलिसांकडून विशेष तयारी करण्यात आली आहे. याच अुषंगाने तळीरामांवर करडी नजर ठेवण्यात येणार असून वाहनचालकांवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत. नववर्षाचे स्वागतही मोठ्या उत्साहात केले जात असते. यादरम्यान मद्यप्राशन करुन वाहन चालविणाऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ होते. मद्यप्राशन करुन वाहन चालवल्यास अपघात होण्याची भीती असते. अशा मद्यपी चालकांना रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे.२५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान वाहतूक पोलिसांकडून नाकाबंदी करण्यात येणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

## भाजपाला हादरा, शेकापला बळकटी

### कळंबोली वसाहतीतील भाजप कार्यकर्त्यांचा शेकापमध्ये प्रवेश

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

कळंबोली शहराच्या राजकारणात महत्त्वाची उलथापालथ झाली असून भाजपामधील शेकडो महिलांनी माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या उपस्थितीत शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला आहे.

भारतीय जनता पार्टीचे माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्या खांद्याला खांदा लावून कात करणाऱ्या निडर कार्यकर्त्या म्हणून ओळख असलेल्या गौरी कोरडे व यशोदा आलदर यांच्यासह जवळपास ५०० महिला कार्यकर्त्या व पदाधिकाऱ्यांनी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला. हा पक्षप्रवेश कळंबोलीतील राजकीय समीकरणांना कलाटणी देणारा ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



हा प्रवेश सोहळा गुरुवारी (दि.२५) कळंबोली येथील शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यालयात माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी यशोदा आलदर यांच्या नेतृत्वाखाली महिला कार्यकर्त्यांनी शेकापमध्ये प्रवेश केल्याने पक्षाच्या महिला संघटनाला मोठे बळ मिळाल्याचे चित्र दिसून आले. या पक्षप्रवेशामुळेआगामीकाळातशेतकरी कामगार पक्षाला निश्चितच मोठा फायदा होणार असून कळंबोलीतील राजकारणात नवे समीकरण आकारास येईल, असा विश्वास गोपाळ भगत यांनी व्यक्त केला. महिला शक्तीच्या या प्रवेशामुळे शेकापची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाल्याचे स्पष्ट होत आहे. आतापर्यंत अनेक वर्ष मी भाजपसाठी निष्ठेने काम केले. मात्र कार्यकर्त्यांना कोणत्याही प्रकारे विचारात न घेता आपला फक्त वापर करून घेतला जात असल्याची भावना यावेळी गौरी कोरडे यांनी व्यक्त केली.




## विमान झेपावले, भूमिपुत्र पेटले

**। उरण । प्रतिनिधी ।**

**नवी मुंबई विमानतळावरून नियमित उड्डाणे सुरू करण्याची घोषणा होत असताना, या विमानतळासाठी ज्यांच्या जमिनी गेल्या, त्या भूमिपुत्रांच्या नोकऱ्यांचा प्रश्न मात्र अजूनही अनुत्तरित आहे. ही अत्यंत संतापजनक बाब असल्याची भावना प्रकल्पग्रस्तांमध्ये आहे. नोकऱ्या नसल्याने प्रकल्पग्रस्त व स्थानिक भूमीपुत्रांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. आचारसंहितेचे कारण पुढे करून भूमिपुत्रांच्या अस्मितेच्या लक्ष्याला स्थगिती दिली जाते, मात्र विमान कंपन्यांचे उद्घाटन सोहळे, जाहिरातबाजी आणि उड्डाणांची तयारी यांना आचारसंहिता लागू होत नाही, हा सरळसरळ दुटप्पीपणा असल्याचा आरोप प्रकल्पग्रस्तांनी केला आहे.**

विमानतळासाठी भूमिपुत्रांच्या जमिनी कायमस्वरूपी संपादित केल्या असतील, तर त्या बदल्यात मिळणाऱ्या नोकऱ्या व व्यवसायही कायमस्वरुपीच मिळाले पाहिजेत. खासगीएजन्सीमार्फतकंत्राटीकामगार भरती करून भूमिपुत्रांना डावलण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा भूमिपूत्रांकडून देण्यात आला आहे.याबाबत प्रकल्पग्रस्तांनी एक संतप्त सवालही उपस्थित केला आहे. ज्यांच्या संघर्षांमुळे नवी मुंबई उभी राहिली, ते लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव भूमिपुत्रांकडून प्रस्तावित आहे. त्यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला कधी लागणार? उद्घाटन झाले, उड्डाणे सुरू होत आहेत. नामकरणाच्या बाबतीत शासन मुद्दाम टाळाटाळ करत आहे का? असा प्रश्नही विचारला जात आहे. •> पान २ वर

### नवी मुंबईकरांनी अनुभवला ऐतिहासिक क्षण

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या व्यावसायिक उड्डाणाचा ऐतिहासिक क्षण अनुभवण्यासाठी प्रवाशांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. नोव्हेंबरपासूनच अनेकांनी पहिल्या प्रवासासाठी तिकीट आरक्षण करून हा दिवस डोळ्यांत साठवून ठेवला होता. विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, विकसक, प्रकल्पग्रस्त कुटुंबे आणि विविध क्षेत्रांतील नागरिक कुटुंबियांसह या सोहळ्याचे साक्षीदार ठरले.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची संकल्पना प्रत्यक्ष उड्डाणापर्यंत नेण्याचा सुमारे २५ वर्षांचा प्रवास आज पूर्णत्वास गेला, याचे समाधान अनेकांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. अनेक आंदोलने, मोर्चे, उपोषणे असा संघर्षाचा प्रवास ऐतिहासिक असल्याने खास प्रकल्पग्रस्तांना आमंत्रित करण्यात आले. त्यांच्या जमीन त्यागावर हे विमानतळ उभे राहिल्याची भावना यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. प्रकल्पग्रस्तांनी विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी करत काही •> पान २ वर

## दि. बा. पाटील नावावरून प्रकल्पग्रस्तांचा संताप



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकार्पण मोठ्या उत्साहात झाले असले, तरी विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव न दिल्याने प्रकल्पग्रस्त, शेतकरी आणि विविध सामाजिक संघटनांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. वारंवार दिलेल्या आश्वासनांनंतरही नाव जाहीर न झाल्याने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुरुवारी देशांतर्गत विमानसेवा सुरू झाली. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी प्रवासी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. या आनंदाच्या वातावरणातच विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दि. बा. पाटील •> पान २ वर

> निवडणुकीची आचारसंहितेची कारणे सांगून आमचे आंदोलन सरकारने दडपले. मात्र आचारसंहिता संपल्यावर आगरी समाजातील दि.बा. पाटील यांचे समर्थक सनदशीर मार्गाने सरकारला हिसका दाखवतील. हुतात्म्यांचे रक्त वाया जाऊ द्यायचे नसते, याच दिबांच्या उक्तीप्रमाणे प्रखर आंदोलन उभे करून दिबांचेच नाव या विमानतळाला देण्यास सरकारला भाग पाडू.
>
> – बाळाराम पाटील, माजी आमदार, शेकाप.



● आज नाताळ सुट्टीसाठी जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठी गर्दी झाली. किल्ल्याचे पार्कींग फुल्ल होऊन गाड्या समुद्रावर लागल्या. पार्कींग नियोजन चांगले असल्याने पर्यटक खुश आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## मारहाण करणाऱ्या शिक्षिकांविरोधात गुन्हा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कामोठे परिसरातील एका नामांकित शाळेत सहा वर्षांच्या चिमुकल्यावर शिक्षकांकडून मारहाण झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी दोन महिला शिक्षिकांविरोधात बाल न्याय अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे पालकवर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे. कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या सेक्टर २४ येथील एका शाळेत सहा वर्षीय विद्यार्थ्याला दोनवेळा दोन वेगवेगळ्या शिक्षिकांकडून मारहाणीचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

पीडित पालकांनी दिलेल्या तक्रारीनूसार १४ आणि २८ नोव्हेंबरला मारहाणीची घटना शाळेत घडली. शाळकरी मुलांच्या आपसातमधील भांडणावरून याची सुरूवात झाली. संशयीत आरोपी वर्गशिक्षिकेने १४ नोव्हेंबरला दुपारी १ ते २ या वेळेत दुसऱ्या वर्गातील एका विद्यार्थिनीला बोलावून पिडीत मुलाच्या गालावर पाच ते सहा वेळा मारण्यास सांगितले.

ही घटना घडत असताना संबंधित शिक्षिका हसत असल्याचा आरोप तक्रारीत पालकांनी केला. त्यानंतर दुसरी घटना २८ नोव्हेंबरला सकाळी ११ ते ११.३० या वेळेत इंग्रजी विषयाच्या शिक्षिकाच्या हाती घडली. या शिक्षिकेने विद्यार्थ्याच्या तोंडावर कंपास बॉक्सने मारहाण केली. या मारहाणीत मुलाचा ओठ सुजल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दोन्ही घटनांमुळे मुलाला शारीरिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

फिर्यादींनी याबाबत यापूर्वी शाळा व्यवस्थापनाकडे दाद मागितली. मात्र शाळा व्यवस्थापनाच्या प्रतिसादावर समाधान झाल्याने पालकांनी पोलीस ठाण्यात अर्ज केला होता. पोलिसांनी प्राथमिक चौकशीनंतर आणि शाळा व्यवस्थापनाचे जबाब नोंदविल्यानंतर मंगळवारी रात्री गुन्हा नोंद केला. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अरविंद मसलकर हे करीत आहेत.

नोव्हेंबर महिन्यात अशाच प्रकारचीमारहाणएकाविद्यार्थिनीला खारघर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाल्याने विद्यार्थ्यांच्या सूरक्षेविषयी चिंता व्यक्त केली जात असताना ही दुसरी घटना कामोठे •> पान २ वर

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वाहतूककोंडी

### चार-पाच दिवस प्रवाशांना त्रास

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर पुण्यातील अमृतांजन ब्रिजपासून पाच ते सहा किमीपर्यंत वाहनांच्या मोठ्या रांगा लागून वाहतूक कोंडी झाली होती. नाताळसह विकेंडच्या मुहूर्तावर पर्यटक बाहेर फिरायला येत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील पुणे लेनवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. नाताळचा सण साजरा करण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक घराबाहेर पडल्याने या महामार्गावर वाहतुकीचा मोठा खोळंबा निर्माण झाला आहे. लोणावळा परिसरात जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर ही कोंडी अधिक तीव्र असल्याचे दिसून येत आहे.

वाहतूक कोंडीची माहिती मिळताच महामार्ग पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस प्रशासनाकडून वाहनचालकांना संयम बाळगण्याचे आणि नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रवाशांनी वाहतूक स्थितीची माहिती घेऊनच बाहेर पडावे, असे आवाहन महामार्ग पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### ख्रिस्ती बांधव चर्चमध्ये दाखल | रायगडात नाताळ फिव्हर

## जिंगल बेल!..जिंगल ऑल दी वे

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जोसेफ आणि मेरी यांचा मुलगा येशू यांना ख्रिश्चन धर्मात सर्वोच्च स्थान आहे. २५ डिसेंबर हा प्रभु येशू यांचा जन्मदिवस आहे. दरवर्षी त्यांचा जन् दिवस नाताळ सण म्हणून साजरा केला जातो. रायगड जिल्ह्यातील चर्चमध्ये येशू ख्रिस्ताच्या जन्मोत्सवाचा नाताळ सण मध्यरात्री अत्यंत भक्तिभावात, श्रद्धा आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

नाताळच्या पावन पर्वानिमित्त जिल्ह्यातील ख्रिस्ती बांधव मोठ्या संख्येने चर्चमध्ये दाखल झाले होते. रायगड जिल्ह्यात अनेक चर्च आहेत. यामध्ये ऐतिहासिक असणाऱ्या चर्चमध्ये माउंट कार्मेल चर्च कोर्लई, पोर्तुगीज चर्च रेवदंडा आणि सेंट अँथनी चर्च यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. चर्च ऑफ द नाझरेन क्रांती नगर, श्री स्वामी समर्थ नगर, सेंट अल्फोन्सा चर्च गणेश नगर, महाडिक वाडी, महाड, द पेंतेकोस्टल मिशन चर्च खोपोली, नेरळ येथे अवर लेडी ऑफ फातिमा चर्च आणि डोम बॉस्को युवा केंद्र सारखी ठिकाणे आहेत. तसेच अलिबाग, कर्जत, पनवेल, पेण, उरण आदी तालुक्यांमध्ये अनेक छोटी चर्च आणि प्रार्थना स्थळे आहेत.

चर्चमध्ये विशेष मिस्सा आयोजित केली जाते, ज्याला ख्रिसमस मिस्सा असे म्हणतात. मिस्सामध्ये प्रार्थना, बायबलचे वाचन, गायनचा समावेश होता. या मिस्सा व्यतिरिक्त अनेक कानांना गोड वाटणारी ख्रिसमसची •> पान २ वर




### चर्चला रंगीबेरंगी विद्युत रोषणाई

नाताळ सणाच्या पार्श्वभूमीवर चर्च आणि संपूर्ण परिसर आकर्षक पद्धतीने सजवण्यात आला होता. रंगीबेरंगी विद्युत रोषणाई, फुलांची सजावट आणि नाताळविषयक प्रतीकांमुळे चर्च परिसर उजळून निघाला होता. ऐतिहासिक चर्चचे सौंदर्य रात्रीच्या रोषणाईत अधिकच खुलून दिसत होते. मध्यरात्री ठीक १२ वाजता येशू ख्रिस्ताच्या जन्माची विधिवत घोषणा करण्यात आली. त्यानंतर विशेष प्रार्थना, स्तुतिगीतं, धार्मिक विधी मोठ्या भक्तिभावाने पार पडली.

### सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी केली सामूहिक प्रार्थना

यावेळी उपस्थित भाविकांनी शांतता, ऐक्य, बंधुता आणि सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी सामूहिक प्रार्थना केली. नाताळचा संदेश मानवतेचा, प्रेमाचा आणि त्यागाचा असल्याचं धर्मगुरूंनी आपल्या संदेशातून उपस्थितांना सांगितलं. समाजात शांतता, सलोखा आणि परस्पर सन्मान टिकवून ठेवण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलं.

# रांजणपाड्यामध्ये धनदांडग्यांसाठी रोहित्र

## उपसरपंचाविरोधात सीईओंकडे तक्रार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**रांजणपाडा गावासाठी रोहित्र लावण्याची बतावणी करून याठिकाणी फक्त धनदांडग्यांसाठी रोहित्र लावण्यात आला आहे, असा आरोप रांजणपाड्यातील काही ग्रामस्थांनी केली आहे. आवास ग्रामपंचायतीच्या उपसरपंचांनी खेटी बैठक दाखवून आदित्य किलाचंद यांना रोहित्र लावून दिल्याने त्यांच्या विरोधात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे प्रतिक मोहितेसह अनेकांनी लेखी तक्रार केली आहे. या तक्रारीत उपसरपंच राजेंद्र वाकडे यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.**



> रांजणपाडा येथे घरे वाढली आहेत. ट्रान्सफार्मरची गरज निर्माण झाली होती. हा प्रश्न प्रलंबित होता. त्यामुळे ट्रान्सफार्मर बसविण्यात आला आहे. ग्रामस्थांना विश्वासात घेऊनच ही प्रक्रिया पार पाडली आहे. जे आरोप केले आहेत, ते खोटे आहेत. – राजेंद्र वाकडे, उपसरपंच, आवास

या तक्रारीत, रांजणपाडा येथील गट नंबर ११५/२ ही मिळकत पूर्वी रांजणपाडा गावकऱ्यांची होती. या मिळकतीचे पंच मंडळी राजेंद्र वाकडे व इतरांनी माधुरी वाकडे यांना सुमारे २५ लाख रुपयांना विकली. त्यानंतर वाकडे यांनी ही मिळकत आदित्य सुधीर किलाचंद यांना विकली. दरम्यान, आवासचे विद्यमान उपसरपंच राजेंद्र वाकडे यांनी गावासाठी रोहित्र घेण्याचा दिखावा करीत खोटी बैठक लावली. गावकीच्या नावाखाली किलाचंद यांच्या गट नंबर ११५/२ मध्ये ट्रान्सफर्मर व उच्चदाब वाहीनीची केबल टाकली आहे. रांजणपाडा गट नंबर ११३(महाराष्ट्र शासन बिनआकारी कुरण) या मिळकतीमधून तसेच प्रतिक मोहिते (सिटी सर्वे नंबर ९०४) व इतरांच्या खासगी मिळकतीमधून हा प्रकार करण्यात आला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रत्यक्षात बैठकीच्या अर्जावर ऑक्टोबर २०२५ मध्ये रांजणपाडा गावकऱ्यांच्या सह्या घेण्यात आल्या आहेत. परंतु, प्रत्यक्षात २१ एप्रिल अशी नोंद करून ग्रामस्थांची दिशाभूल करण्यात आली आहे. त्यामुळे हे रोहित्र रांजणपाडा ग्रामस्थांसाठी बसविले नसून ते किलाचंद या धनदांडग्यांसाठी बसविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, या रोहित्रसाठी ग्रामपंचायतीकडून नाहरकत दाखला देण्यात आला. मात्र, त्या दाखल्यावर ग्रामसेवकाची स्वाक्षरी नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सरपंचासह उपसरपंच यांच्याविरोधात कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रतिक मोहिते, राजन पाटील, मनीष गुरव, अशोक गुरव, नयन गुरव मंदर गुरव, संजय वाकडे, समीर वाकडे, गौरव वाकडे, तेजस पाटील, अमित पाटील, महेश गुरव आदी ग्रामस्थांनी केली आहे.

## प्रभाग कार्यालयाबाहेरच फेरीवाल्यांचे बस्तान

**पनवेल :** पालिकेच्या माध्यमातून प्रभाग समिती क अंतर्गत येणाऱ्या कामोठे वसाहतीत सुवर्ण दुर्ग या नावाने कार्यालय सुरु करण्यात आले आहे. मात्र या कार्यलया बाहेरच फेरीवाल्यानी आपले बस्थान बसवल्याचे पाहायला मिळाले असून,अधिकाऱ्यांना या बाबत जाब विचारला असता संबंधित फेरीवल्यानवर कारवाई करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. रस्त्यावर हातगाड्या लावून अतिक्रमण करणाऱ्या फेरीवल्यांवर कारवाई करण्याची जवाबदारी पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडे आहे. अतिक्रमण विभागकडून वेळोवेळी ही कारवाई होणे अपेक्षित आहे. कामोठे वसाहत मात्र याला अपवाद ठरत असल्याचे पाहायला मिळत आहे.वसाहतीत जागा मिळेल तिथे अतिक्रमण करून व्यवसाय थाटण्यात आल्याचे पाहायला मिळत आहे. पालिकेच्या माध्यमातून वसाहती मधील मानसरोवर रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या भूखंड क्रमांक १ बी या सेक्टर ११ येथिल भूखंडा वर सुवर्ण दुर्ग नावाने प्रभाग कार्यालय सुरु करण्यात आले आहे.


**अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि. रायगड**
**जाहिर निविदा सन २०२५-२६**

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे संगणक विभागा कडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत आस्थापना/व्यावसायिक करीता जाहीर निविदा दरपत्रक मागविणेत येत आहे.

टिप:- वरील निविदेमध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती व निविदा फॉर्म साठी नगरपरिषद कार्यालयातील संगणक विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळता) संपर्क साधावा.

दिनांक : २६/१२/२०२५

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद जि. रायगड**

**मांडवा सागरी पोलीस ठाणे झिराड-अलिबाग**
**झिराड रा.जि.प. शाळेच्या मागे, ता. अलिबाग**
**जिल्हा रायगड, पिनकोड - ४०२२०१.**
**दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१/२४७७२२**
**ई मेल:** rgdmandavaps@gmail.com, ps.mandva.rd@mahapolice.gov.in

जा.क. /२०२५ मांडवा सागरी पोलीस ठाणे/पेपर नोटीस दि. १६/१२/२०२५

**जाहीर नोटीस**

आपणांस कळविण्यात येते की, मांडवा सागरी पोलीस ठाणे गु. रजि. नं. ८७/२०२५ भा.दं.वि.सं. कलम २८७ सह जिवनावश्यक वस्तू अधिनियम सन १९५५ चे कलम ३,७ प्रमाणे या गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल पाणी मिश्रीत डिझेल याचा जाहीर लिलाव करून येणारी रक्कम सरकार भरणा करावी असा मा जिल्हाधिकारी सो, अलिबाग रायगड यांचे कार्यालयाकडील क्र. पूरवठा/कात-१२/मांडवा/गु.र.नं.८७/२०२५/२७४९ दि.१५/१२/२०२५ अन्वये आदेश झालेले आहेत. तरी सदरचा लिलाव मांडवा सागरी पोलीस ठाणे ता.अलिबाग आवारात आयोजीत केला आहे. तरी लिलाव घेण्यास इच्छुक असणाऱ्यांनी हजर रहावे.

लिलावाच्या अटि:- १. लिलाव सुरू होण्यापुर्वी अनामत रक्कम ५०००/- रू. मात्र भरणा करणे.
२. ज्याची बोली जास्त असेल त्यास लिलाव देण्यात येईल व बोलीची रक्कम अदा केल्यावरच सदरचा डिझेल ताब्यात देण्यात येईल.
३ लिलावात असणारा डिझेल लिलावाच्या वेळी जसा आहे तसा अवस्थेत पहावयास मिळतील.
४. लिलावात अंतिम निर्णय व लिलाव रद्द करण्याचे अधिकार प्रभारी अधिकारी मांडवा सागरी पोलीस ठाणे यांचेकडे राहील.
५. लिलावात भाग घेणाऱ्यांनी त्यांचेकडील अनुन्यप्राप्ती अथवा नोकरनाम्याच्या प्रती सोबत आणाव्यात.
लिलावात ठेवण्यात आलेला मुद्देमाल:-५००० लिटर पाणी मिश्रीत डिझेल गुन्ह्याचे वेळी जप्त करण्यात आलेला लिलावाचे ठिकाण/दिनांक/वेळ:- दिनांक ३०/१२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वा. मांडवा सागरी पोलीस ठाणे झिराड ता. अलिबाग जि. रायगड येथे

शिक्का **सही/-**
**पोलीस निरीक्षक**
**मांडवा सागरी पोलीस ठाणे**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १७/४ | एकूण क्षेत्र ०-५९-०० हे.आर. | ०.५६ |
| १७/२ | एकूण क्षेत्र ०-४७-०० हे.आर. | ०.५९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- २६/१२/२०२५ सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७


# पान १ वरून

## विमान झेपावले, भुमिपुत्र पेटले

नामकरणासाठीची अस्मितेची लढाई आचारसंहिता संपल्यानंतर अधिक तीव्रतेने उभी राहीलच. मात्र किमान नवी मुंबई विमानतळावरील कामगार भरतीत तरी भूमिपुत्रांची फसवणूक होऊ नये, यासाठी भूमिपुत्रांना कायमस्वरूपी रोजगार मिळालाच पाहिजे, ही मोहीम तात्काळ सुरू करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता विमानतळ सुरु झाल्याने प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांचा विश्वासघात झाला आहे.

## नवी मुंबईकरांनी अनुभवला ऐतिहासिक क्षण

क्षणासाठी येथे घोषणाबाजी केली. समजूत काढल्यानंतर प्रकल्पग्रस्तांपैकी प्रवाशांना विमानतळ परिसरात प्रवेश देण्यात आला.

सकाळी आठ वाजता बंगळुरूहून आलेले ६ ई ४६० विमान धावपट्टीवर उतरले असता जलतोफांच्या सलामीने त्याचे स्वागत करण्यात आले. हा क्षण अत्यंत भावूक आणि आनंददायी असल्याची प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केली. त्यानंतर सकाळी ८.४० वाजता ६ ई ८८२ हे विमान हैदराबादसाठी रवाना झाले. पहिल्या प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी अनेकांनी परतीची तिकिटेही काढली होती.

## दि. बा. पाटील नावावरून प्रकल्पग्रस्तांचा संताप

यांचे नाव न दिल्याने नाराजीचा सूर उमटला.

राज्याचे मुख्यमंत्री यांनी नुकतेच माध्यमांशी बोलताना विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात येईल, असे पुन्हा एकदा आश्वासन दिले होते. तरीही उद्घाटनाच्या दिवशी नाव जाहीर न झाल्याने प्रकल्पग्रस्तांचे समाधान झाले नाही. याच पार्श्वभूमीवर काही प्रकल्पग्रस्तांनी विमानतळ परिसरात पोलीस बंदोबस्तातच, दि. बा. पाटील यांच्या नावाच्या घोषणा दिल्या.या विमानतळातून पहिल्या उड्डाणाने प्रवास करणारे ठाणे जिल्ह्याचे माजी खासदार संजीव नाईक यांनीही मुख्यमंत्री यांचे आभार मानताना दि. बा. पाटील यांचे नाव दिले असते तर आनंद द्विगुणित झाला असता, अशी प्रतिक्रिया दिली. यावेळी दि. बा. पाटील यांचे कुटुंबीयही प्रवाशांसोबत त्यांच्या छायाचित्रांसह उपस्थित होते. सरकारने ठरल्याप्रमाणे नाव दिले असते तर समाधान वाटले असते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

यानंतर काही तासांतच शेकापचे विधानपरिषदेचे माजी आमदार बाळाराम पाटील, काँग्रेसचे पदाधिकारी सुदाम पाटील व समर्थकांनी करंजाडे येथील काळभैरव मंदिरासमोर निषेध आंदोलन केले.सरकारसाठी हा सुवर्ण दिन असला, तरी दि.बा. पाटील यांना आदर्श मानणाऱ्यांसाठी हा काळा दिवस असल्याचे त्यांनी जाहीर केले. विमानतळाच्या पूर्व बाजूकडील मार्गावर दि.बा. पाटील यांच्या समर्थनार्थ फलकबाजीही करण्यात आली.जोपर्यंत विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव दिले जात नाही, तोपर्यंत आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला असून, गरज पडल्यास मुंबई जाम करण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

## मारहाण करणाऱ्या शिक्षिकांविरोधात गुन्हा

येथे घडली. या दोन्ही घटनांमुळे शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी पालकवर्गाकडून करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून मारहाण करणे या गुन्ह्याला सात वर्षांपेक्षा अधिक काळ शिक्षा होत नसल्याने या प्रकरणी तपास अधिकारी मसलकर यांनी संबंधित शिक्षकांना या प्रकरणी नोटीस बजावली.

## भरधाव कार हॉटेलमध्ये शिरली

शेजारी असलेल्या घरासमोरच्या शेडला जाऊन आदळली. या अपघातामध्ये घराच्या शेडचे पूर्णतः नुकसान झाले असून चालक अमर गणेश तिवारी हा किरकोळ जखमी झाला आहे. याबाबत महाड तालुका पोलीस ठाण्यामध्ये कोणतीच तक्रार दाखल झाली नसली तरी घटनेचे वृत्त समजताच पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून पोलीस दप्तरी नोंद केली आहे.

## लाडक्या बहिणींची धावपळ

शिल्लक आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात विद्युत पुरवठा खंडित होणे, इंटरनेटच्या अडचणी, ईकेवायसीसाठी लागणारे साधन सामग्री उपलब्ध नसल्याकारणाने अजून मुदत वाढ मिळावी, अशी मागणी महिला वर्गातून होत आहे.

## समुद्रातील खारे पाणी भातशेतीत

ग्रामपंचायत हद्दीतील १०० एकर जागेवर भराव टाकून मल्टिमॉडेल लॉजिस्टीक पार्क उभारण्याच्या तयारीत आहे. त्यासाठी एमआयडीसी आणि मेरिटाईम बोर्डाने जागा निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे चाणजे, खोपटा, गोवठणे, वशेणी, पुनाडे, आवरे, पिरकोन, विंधणे, मोठी जुई ग्रामपंचायत हद्दीतील उरल्यासुरल्या भात शेतीत उधाणाचे पाणी शिरुन खारफुटीचे जंगल वाढण्याचा तसेच भातशेती नापीक होण्याचा संभव आहे.तरी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण येथील अधिकाऱ्यांनी पाहणी करून बांधबंदिस्तीची कामे मार्गी लावावीत, अशी मागणी शेतकरी करीत आहे.

## जिंगल बेल!..जिंगल ऑल दी वे

गाणी म्हणजेच ख्रिसमस कॅरॉल्स गायली गेली. या गाण्यांमधून येशू ख्रिस्ताच्या जन्माची कथा आणि ख्रिसमसचा संदेश ऐकावयास मिळाला.

**ख्रिस्ताच्या जन्माचे सुंदर आणि मनमोहक देखावे**

नाताळ सणाच्या आनंदात सहभागी होत ख्रिस्ती बांधवांनी येशू ख्रिस्ताच्या जन्माचे सुंदर आणि मनमोहक देखावे साकारले होते. बाल येशू, माता मेरी, संत जोसेफ, गोठा, मेंढपाळ आणि देवदूतांचे प्रतीकात्मक दृश्य पाहण्यासाठी ग्रामस्थांसह पर्यटकांनीही मोठी गर्दी केली होती. लहान मुले, तरुण आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यात नाताळ सणाचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत होता. नाताळच्या निमित्ताने आनंद, उत्साह आणि आपुलकीचं वातावरण निर्माण झालं असून, सर्व धर्मीय नागरिकांनी एकमेकांना नाताळच्या शुभेच्छा देत सामाजिक सलोखा आणि बंधुभाव जपल्याचं सुंदर चित्र पाहायला मिळालं. नाताळ सणामुळं गावात सकारात्मक वातावरण निर्माण झालं असून, हा सण शांतता आणि एकोप्याचा संदेश देणारा ठरल्याचं नागरिकांनी सांगितलं.

## कला साहित्य भूषण पुस्तक प्रकाशित

**मुंबई :** गझल नवाझ भिमराव पांचाळे यांनी भाषणबाजी न करता, संगीताची साथ संगत नसताना त्यांच्या गझला पेश करून असा काही माहौल तयार केला की, त्यांच्या अर्थपूर्ण, आर्त सुरांमध्ये उपस्थित रसिक कधी, कसे हरवले, ते त्यांचे त्यांनाच कळाले नाही! त्यांच्या या गायनाने, कला साहित्य भूषण या पुस्तकाचा मुंबईत झालेला प्रकाशन समारंभ रसिकांच्या सदैव स्मरणात राहील.या पुस्तकाचे लेखक देवेंद्र भुजबळ यांनी या पुस्तकात समाजासाठीचे योगदान याविषयी माहिती दिली.


**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय रायगड, महाराष्ट्र शासन**

खरीप पणन हंगाम २०२५-२६ व २०२६-२७ साठी किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धान/सीएमआरच्या वाहतूकीचे दर निश्चतीसाठी ई-निविदा सूची

जिल्हाधिकारी रायगड, महाराष्ट्र शासन, अनुभवी निविदाधारकांना स्पर्धात्मक बोली प्रस्तावांना प्रक्रीयेत सहभागी होण्यासाठी आमंत्रित करत आहेत.

तपशिलवार निविदा दस्ताऐवजासाठी इच्छुक बोलीदारांनी : https://www.mahatenders.gov.in/nicgep/app व www.raigad.gov.in या वेबसाईटवर भेट द्यावी.

निविदा ऑनलाईन सादर करावयाची आहे. निविदेत सहभागी होण्यासाठी संगणकीय नोंदणी करुन आवश्यक माहिती अपलोड करण्याचा कालावधी दि. २४/१२/२०२५ ते दि. ०६/०१/२०२६ रोजी दुपारी/सायं. ०६.०० वा. पर्यत आहे.

जिल्हाधिकारी रायगड यांच्या मान्यतेने

सही/-
**(दिपाली ब्राम्हणकर)**
**सहा.जिल्हा पुरवठा अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

**क्र जिमाका राअ/जाहि/३२४/२०२५-२६**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| १३/२/क | एकूण क्षेत्र २-३५-०० हे.आर. या पैकी समीर अनंता देशमुख याचे मालकीचे खाते क्र. ७८० ज्याचे क्षेत्र १-०६-०० हे आर या जमीन मिळकतीबाबत | ०.७३ |

**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| ६७/५/अ | एकूण क्षेत्र ०-९९-०० हे. आर. यापैकी जगदीश कृष्णा सातवी व इतर १ याचे मालकीचे खाते क्र.२६० ज्याचे क्षेत्र ०-४९-०० हे आर या पैकी विक्री क्षेत्र ०-२०-०० हे.आर | ०.०३ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २५/१२/२०२५
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड पिन नं.४०२१०७

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की, माझ्या अशिलांनी मौजे -अलिबाग, नगरपरिषद ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक श्री. मंगेश बबन निगडे व सौ. अनिता मंगेश निगडे यांच्या खुद्द मालकीची खालील वर्णनाची निवासी सदनिका ही खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीमधील सिटी सर्व्हे. A/897, B/897, K/897, A/898, B/898, K/898,898/1, 898/2, 900/A/1, 899, 900/K/A(900E), 900/1, 901, 900/K/C, 900/A/4, 900/A/3, 900/K/B, 900/A/2, 900/2, 900/A/3, 904/1, 902 या मिळकतीवरील असणारी कुबेराक्षे सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. इमारतीमधील तिसरा मजल्यावरील सी विंग मधील निवासी सदनिका क्रमांक ३०२, क्षेत्र ३८.०० चौ.मी रे.रा कारपेट बाल्कनी क्षेत्र ९.२० चौ.मी व कपबोर्ड १.९५ चौ. मी अलिबाग नगरपरिषद मालमत्ता जुना व नवीन क्रमांक ALB 000005074 (क्षेत्रफळ ४०.१२) ही निवासी सदनिका खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

तरी वर वर्णन केलेली मालमत्ता विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वाहिवाटीत, निर्वेध बोजा विरहित विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या आशिलास दिली आहे. तरी वरील मालमत्तेसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितं संबध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासाहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसाचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास माझे अशिल या संदर्भित मालमत्तेचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/१२/२०२५ सही/-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए/बी, आई बंगला, 'शिवसागर', वसाहत, कुरूळ ता. अलिबाग,जि. रायगड ४०२२०९
मो. नं. ९८८१६३७९२४
ई मेल: sp3589166@gmail.com

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे. आर. पो) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी ता.अलिबाग, जि.रायगड | २३३ | एकुण ०.३६.१० | ४.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध ताबाकब्जा भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य दस्त कोणत्याही प्रकारचा हित संबंध असल्यास त्यांनी ह्या नोटीसीच्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत प्रथमदर्शनी पुरव्यासह त्यांच्या लेखी हरकती दाखल कराव्यात याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतेही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भात नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येण्याऱ्या कोणत्याही हरकतीस माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २५/१२/२०२५
**ॲड. अमर अशोक घरत**
मु.पो.थळ, पेठ नाका, ता.अलिबाग, जि.रायगड मो.नं ८८०५०३७४७४,७७९८९३०७०८

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोर्लई, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६/२ | एकूण क्षेत्र ०-४८-०० हे.आर. | ८.८९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेउन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- २६/१२/२०२५ सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ, मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. कुणाल प्रकाश राठोड यांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तीचे मालक अब्दुल वदूद निसार कासकर याचेंकडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७८ | ५ | २७६-०० | २७-६० |
| ७८ | ६ | २७६-०० | २७-६० |
| ७८ | ७ | २८८-०० | २८-८० |

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजामुक्त आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. २६/१२/२०२५.
**ॲड. नरेश रामदास आहीर**
पत्ता-शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राह्मणआळी, नेरळ, ता.कर्जत,जि.रायगड. मो.-९३२५०६००३७.

**पोलादपूर नगरपंचायत, पोलादपूर**
**जाहीर सूचना**

१) पोलादपूर नगरपंचायती मधील जुने साहित्य (भंगार) लिलाव पद्धतीने विकणे.
२) पोलादपूर नगरपंचायत क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचेवर निर्विजीकरण शस्त्रक्रिया करणे. या कामी श्वानांसाठी १० पिंजरे बनविणे.

या कामांसाठी इच्छुक व्यक्ती, संस्था यांचेकडून द्विलीफाफा पद्धतीने निविदा मागवित आहे. सविस्तर निविदा अटी-शर्तीसह नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे.

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत पोलादपूर**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल श्री. कुंडलिक जनार्दन भोपी यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. रामचंद्र उर्फ रामण बाळू हजारे व बेबी रामचंद्र हजारे, राहणार मु. पो. कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड | १०५/२/अ | ०.३४.०० | ०.२५ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. असे समजून विकीचा व्यवहार पुर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. २६.१२.२०२५
**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. शॉप नं. २ पाल टॉवर भिसेगाव ता. कर्जत जि. रायगड. मो. ९३०७८८५७११

# निवडक

## वेश्वी केंद्राची शिक्षण परिषद

**अलिबाग :** तालुक्यातील सागाव, तळवली येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेमध्ये वेश्वी केंद्राची शिक्षण परिषद पार पडली. या परिषदेत सकारात्मक शिस्त, शालेय अभिलेख, निपूण महाराष्ट्र, जनरल रजिस्टर अपडेट कसे ठेवावे, परिपत्रकाविषयी आणि इतर शैक्षणिक योजना, व्हीएसके पोर्टल अशा विविध विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले. या सभेचे उद्घाटन खंडाळे ग्रामपंचायत सदस्य संदेश पाटील, तळवली शाळेचे समिती अध्यक्ष सचिन पाटील, वेश्वीचे केंद्रप्रमुख संजय पोईलकर व विनायक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ही शिक्षण परिषद यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका घरत, गोसावी, तुणतुणे, पदवीधर शिक्षक सुर्वे आणि शाळा कमिटीने खूप मेहनत घेतली. यावेळी संजय पोईलकर, बीट विस्तार आधिकारी विनायक पाटील, मेघा मगर, मुख्याध्यापक संतोष भगत व गणेश सावंत यांनी मार्गदर्शन केले. वेश्वी केंद्रातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने या परिषदेस उपस्थित होते.

## पाताळगंगा नदीत तरुणाचा मृत्यू

**रसायनी :** वाशिवली येथील संदिप पाटील (३५) याला गेल्या चार वर्षांपासून फिट येत होती. दरम्यान, संदिप हा सकाळी उठून वाशिवली येथील पाताळगंगा नदीच्या काठावर गेला होता. त्यावेळी त्याला फिट आल्याने तो पाताळगंगा नदी पात्रात पडला. उपस्थित नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी त्याला उपचारासाठी चौक येथील ग्रामीण रुणालयात नेले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणी करून संदिपला मयत घोषित केले. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात नोंद झाली असून वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे हे अधिक तपास करीत आहेत.

## सर्व्हरमुळे उमेदवारांचा खोळंबा

**पनवेल :** महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असताना निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी इच्छुक उमेदवारांना प्रतिज्ञापत्र तयार करून घेताना पनवेल तहसील कार्यालयात अडथळे येत आहेत. काही दिवसांपासून सव्हर डाऊन असल्यामुळे त्यांचे प्रतिज्ञापत्र तयार होऊ शकलेले नाही. त्यामुळे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांची, तसेच विविध कामे घेऊन येणाऱ्या नागरिकांचीही गैरसोय होत आहे.पनवेल तहसील कार्यालयात सर्व्हर डाऊन असण्याची समस्या अनेकदा जाणवत असते. त्यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. सध्या निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी उमेदवारांना आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणे गरजेचे आहे. आतापर्यंत जवळपास ५०० निवडणूक अर्जांची विक्री झाली आहे. परंतु, अद्यापही एकाही उमेदवारानेही अर्ज भरलेला नाही. मात्र, या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे. अर्ज भरताना विविध कारणांसाठी उमेदवारांना प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे असते. महसूल विभागाच्या माध्यमातून पनवेल पालिका क्षेत्रातील उमेदवारांसाठी पनवेल तहसील कार्यालयातून प्रतिज्ञापत्र यावे लागते. इच्छुक उमेदवारांसह इतर कामे घेऊन येणाऱ्या नागरिकांची सेतू कार्यालयात गर्दी होत आहे. परंतु, ऑनलाइन प्रतिज्ञापत्र तयार करण्यात येणाऱ्या वेबसाइटचा सर्व्हर डाऊन असल्यामुळे अनेक उमेदवार, उमेदवारांचे प्रतिनिधी यांना ताटकळल थांबावे लागते आहे. त्यामुळे प्रतिज्ञापत्र मिळू न शकल्यामुळे उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## गोमांस वाहतूक करणारे ताब्यात

**पनवेल :** पळस्पे गावाजवळील पुलावर पनवेल शहर पोलिसांनी एका झायलो गाडीला थांबवून तिची तपासणी केली. या तपासणी दरम्यान त्यामध्ये गोवंश जातीच्या चार बैलांची कत्तल केलेल मांस सापडले. हे मांस महाड येथून गोवंडी-मुंबई येथे गैरकायदेशीररित्या विक्रीकरिता घेऊन जात असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी तिघांना ताब्यात घेतले आहे. यावेळी गाडीसह गोमांस असा एकूण ३ लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.



## मुरुड किनारी पर्यटकांची मांदियाळी

**मुरुड :** नाताळ सणाच्या निमित्ताने गुरुवारी (दि.२५) सुट्टी आल्याने मुरुड-जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत आहेत. त्यामुळे मुरुड तालुक्यातील समुद्रकिनारे हाऊसफुल्ल झाले आहेत. दरम्यान, ठिक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. तसेच, तालुक्यातील सर्व लॉज व हॉटेल देखील फुल्ल झाले आहेत. वर्षाअखेर २५ डिसेंबर रोजी नाताळ सणाची मिळणारी ही सर्वात मोठी सुट्टी असल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटक फिरण्यासाठी येत आहेत. जगप्रसिद्ध मुरुड-जंजिरा किल्ला व काशीद समुद्रकिनारा हे पर्यटकांचे मोठे आकर्षण आहे. मुरुड म्हणजे मीनी गोवा म्हणून संबोधले जाते. या ठिकाणी मुंबई-पुणे येथील पर्यटकांना एकदिवसीय सहल आयोजित करणे सोयीस्कर ठरते. या सुट्टीसाठी पर्यटकांनी दोन ते तीन महिने आधीच रुम बुकिंग करून ठेवली असल्याचे येथील लॉज मालकांनी सांगितले. त्यामुळे आयत्यावेळी येणाऱ्या पर्यटकांना रुम मिळत नसल्याने गाडीतच किंवा पार्कींग मध्ये रात्र काढावी लागत असल्याचे देखील त्यांच्याकडून सांगण्यात आले.

## गणेशमूर्ती कार्यशाळा शिबीर



**चिरनेर :** पी.डी. खारपाटील माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि.२४) महाराष्ट्र शासन सामाजिक वनिकरण विभाग अलिबाग व वनपरीक्षेत्र पनवेल अंतर्गत पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वनक्षेत्र अधिकारी समीर जाधव, राकेश शिंदे, मोराळे, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर, विजय पवार, जिचंद भगत, पुंडलिक भवर, प्रदीप रसाळ, उत्तम म्हात्रे, विशाखा, मयुरी नारंगीकर, माधुरी ठाकूर, संतोष चव्हाण, विद्यार्थी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेची सुरवात चिरनेर गावचे प्रसिद्ध गणेश मूर्तिकार गजानन चौलकर, विलास हातनोलकर यांच्या हस्ते पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनवून करण्यात आली. तसेच, या कार्यशाळेचे महत्व सामाजिक वनीकरण विभाग पनवेल अधिकारी वर्गामार्फत विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

# पीएनपीत रंगली महाराजांच्या पराक्रमाची गाथा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पीएनपी प्रभाविष्कार अंतर्गत अलिबाग-चेंढरे येथील पीएनपी नाट्यगृहात नागांव येथील पीएनपी सायरस पूनावाला शाळेचा विविध गुणदर्शन सोहळा पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाचा इतिहास व महाराष्ट्राची लोकधारा नृत्याविष्कारातून सादरीकरण केली. तसेच, उपस्थित मान्यवरांनी गाण्याच्या माध्यमातून संभाजी राजांना आदरांजली वाहिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख मान्यवर अलिबागमधील प्रसिद्ध गायिका जुईली म्हात्रे व प्रसिद्ध गायक प्रशांत म्हात्रे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, निलेश खोत, मुख्याध्यापिका गितीका भूचर, ॲकॅडमिक डायरेक्टर राजश्री पाटील, लेखापाल मनिषा रेलकर, अंकित भानुशाली, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आदींसह इतर मान्यवर, शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध गाण्यांवर देखील नृत्याविष्काराचे सादरीकरण केले.











• (छायाचित्र- अमोल नाईक)

# माणगाव शहरातील गटारे तुडुंब

**|| परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात || सांडपाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक**

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहरातील मोरबा रोडच्या दुतर्फा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने गटारे बांधली आहेत. परंतु, ती गटारे तुंबली असून परिसरातील नागरिकांचे आरोग्य, सुरक्षितता आणि जीवनमान धोक्यात आणणारी गंभीर समस्या निर्माण झाली आहे. नगरपंचायत आणि महामार्ग प्राधिकरण यांच्यातील जबाबदारीच्या वादामुळे या गटारांची गेल्या पाच वर्षांत एकदाही नीट साफसफाई झालेली नाही. परिणामी ही गटारे आज कचरा, गाळ व सांडपाण्याने तुडुंब भरली असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे.



दिघी-माणगाव-पुणे हा महत्त्वाचा महामार्ग मोरबा रोड मार्गे माणगाव शहरातून जातो. सन २०२० मध्ये हा महामार्ग पूर्ण झाला असला, तरी त्यासोबत बांधण्यात आलेली गटारे अनेक ठिकाणी आजही अपूर्णावस्थेत आहेत. काही ठिकाणी ही गटारे पूर्णपणे उघडी असून त्यांची खोली सुमारे पाच फूट आहे. अंधारात किंवा पावसाळ्यात या उघड्या गटारांमध्ये पडून अपघात झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. याबाबत नागरिकांनी वेळोवेळी तक्रारी करूनही संबंधित यंत्रणांनी अक्षम्य दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. तसेच, या गटारांची कामे अपूर्ण असल्याचे कारण देत माणगाव नगरपंचायतीने साफसफाईची जबाबदारी टाळली, तर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने वारंवार सूचना आणि तक्रारी करूनही या प्रश्नाकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे या निष्काळजीपणाचा फटका थेट शेतकऱ्यांसह परिसरातील नागरिकांना बसला आहे.

या गटारांमधील तुंबलेले सांडपाणी थेट खांदाड परिसरातील शेतजमिनीत सोडण्यात आल्याने हजारो हेक्टर शेती बाधित झाली असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईची मागणी केली असली, तरी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. तसेच, पावसाळ्याच्या काळात या तुंबलेल्या गटारांमुळे परिस्थिती आणखी भयावह होते. खांदाड, मोरबा रोड, सिद्धीनगर, एसटी बसस्थानक परिसर आणि बामणोली रोड या भागांत दरवर्षी पुरसदृश परिस्थिती निर्माण होते. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य, फर्निचर आणि घरांची संरचना यांचे मोठे नुकसान होते. वर्षानुवर्षे होणाऱ्या या त्रासामुळे नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.

> **“माणगावमधील गटार सफाईच्या कामाला आपण नगरपंचायतीचे सफाई कामगार लावून बामणोली रोडपासून सुरुवात केली असून शहरातील मोर्बा रोड मार्गासह सर्व गटारांची स्वछता लवकरात लवकर करण्यात येईल.**
> **- संतोष माळी, मुख्याधिकारी, नगरपंचायत माणगाव”**

## भावी सदस्यांची प्रचारासाठी लगीनघाई

**| रसायनी | प्रतिनिधी |**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे लवकरच बिगुल वाजणार असल्याने प्रमुख राजकीय पक्षांत युती आघाडीबाबत चर्चा सुरू आहेत. त्यावर अद्यापही शिक्कामोर्तब झाले नसताना, अनेक इच्छुकांनी प्रचाराला सुरुवातही केली आहे. जागावाटप, उमेदवारांची नावे या बाबींना मूर्तरूप येण्याआधीच स्वतःला भावी सदस्य म्हणवणाऱ्यांनी आपापल्या प्रभागात प्रचाराची लगीनघाई सुरू केली आहे. सध्या वासांबे मोहोपाडा जिल्हा परिषद, पंचायत समिती व रिस पंचायत समितीत असे चित्र पाहायला मिळत आहे. परिसरातील प्रत्येक प्रभागात संभाव्य उमेदवार सक्रिय झाले असून सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांनी आपली उपस्थिती ठळकपणे दाखवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

# बालसुरक्षेसाठी रायगड पोलीस सरसावले



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

समाजात लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्यामुळे मुले आणि पोलीस यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण करण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस दल आणि एम्पॉवर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात काका-दीदी पथक, दामिनी पथक आणि जिल्हाभरातील पोलीस कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलिसांचे काका-दीदी आणि दामिनी पथक नियमितपणे शाळांना भेटी देऊन सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श, बालविवाह प्रतिबंध आणि पॉक्सो कायद्याबाबत जनजागृती करत असते. मात्र, अनेकदा पोलिसांच्या गणवेशामुळे किंवा जरबमुळे मुले आपली अडचण सांगायला घाबरतात. पोलीस हा समाजाचा मित्र आहे, हे मुलांच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे. ही संकल्पना पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी मांडली होती. हीच दरी सांधण्यासाठी आणि पोलिसांना अधिक मुलांभीमुख बनवण्यासाठी एम्पॉवर फाऊंडेशनला या प्रशिक्षणाची जबाबदारी देण्यात आली होती. या प्रशिक्षणाचे यशस्वी नियोजन एम्पॉवर फाऊंडेशनच्या दीप्ती हजारी, सेतू कार्यक्रम अधिकारी रुपेश पवार, तालुका क्लस्टर हेड अर्चना पाटील आणि क्लस्टर को-ऑर्डिनेटर पद्मा साठे यांनी केले. तसेच, अमोल काळे, अर्जुन माळगे आणि प्रगती कांबळे यांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले.

**मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान | जेएसएम महाविद्यालयात ‘उन्मेष’चा उत्साह**

# विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

**जनता शिक्षण मंडळाच्या महाविद्यालयाचे सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत, नृत्य, नाट्य, विविध स्पर्धा व डेज यांनी नटलेले वार्षिक स्नेहसंमेलन अर्थात ‘उन्मेष २०२५’ उत्साहात संपन्न झाले. यावेळी जेएसएम महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यादरम्यान, सोमवारी (दि.२२) पार पडलेल्या विविध स्पर्धांचे उद्घाटन जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तर, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन नवनिर्वाचित नगरसेवक व जनता शिक्षण मंडळाच्या उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.**



### स्नेहसंमेलन कलाकार घडविण्याचे व्यासपीठ

अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, जे.एस.एम. महाविद्यालय हे नेहमी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अग्रेसर असते. या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी आपले कलाविष्कार सादर करतात. त्यामुळे हे स्नेहसंमेलन म्हणजे कलाकार घडविण्याचे एक उत्कृष्ट व्यासपीठ आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच, यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या सांस्कृतिक कार्यक्रमातील संगीत, नृत्य, नाट्य या विविध कार्यक्रमांत पारितोषिक प्राप्त केलेल्या व उत्कृष्ट सादरीकरण केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मानित करण्यात आले. या स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नवनिर्वाचित नगरसेवक अनिल चोपडा यांच्यासह प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, उपप्रचार्य डॉ. प्रविण गायकवाड, स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष डॉ. निळकंठ शेरे, उपकार्याध्यक्ष संगीता गाढे, पर्यवेक्षक अजय सावंत व ॲड. सचिन जोशी उपस्थित होते. तसेच, रोझ डे, चॉकलेट डे, साडी डे, टाय डे, ट्रॅडिशनल डे असे विविध डेज साजरे करण्यात आले. दरम्यान, ट्रॅडिशनल डेच्या निमित्ताने एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी पारंपारीक वेशभूषा करून ढोल ताशाच्या गजारात आई एकविरा देवीची पालखी मिरवणूक काढण्यात आली.

जेएसएम महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन ‘उन्मेष-२०२५’चे यशस्वीरित्या आयोजन करण्यासाठी स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष डॉ. निळकंठ शेरे, उपकार्याध्यक्ष संगीता गाढे, जिल्हा सांस्कृतिक समन्वयक प्रा. जयेश म्हात्रे, सांस्कृतिक समिती प्रमुख प्रा. श्वेता पाटील, प्रा. सिमंतीनी ठाकूर, सर्व सदस्य, संयोगी नाईक, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अरवलीची नवी लढाई

अरवली पर्वताचे नाव आपण भूगोल आणि इतिहासाच्या पुस्तकात वाचलेले असते. राजपुतांच्या इतिहासात याचे उल्लेख येतात. चित्तोडगडच्या लढाईनंतर मेवाडचा सुपीक प्रदेश मुघलांनी जिंकला. अरवलीतील डोंगराळ प्रदेश तसेच जंगलांवर राणा प्रतापाचे राज्य होते. त्यामुळेच १५७६ मध्ये हल्लीघाटीची प्रसिध्द लढाई झाली. आता याच अरवली पर्वतावरून नवा संघर्ष सुरु झाला आहे. मात्र ही राजकीय नसून पर्यावरणाची लढाई आहे. किती उंचीपर्यंतच्या टेकड्या म्हणजे पर्वत असा यातला कळीचा प्रश्न आहे. त्यानुसार शंभर मीटर म्हणजे सुमारे सव्वातीनशे फूट इतक्या उंचीची वा त्यावरील टेकडी वा डोंगर हाच पर्वत असे समजून त्याला पर्यावरणाच्या कायद्याचे रक्षण लाभणार आहे. त्याखालच्या सर्व टेकड्यांमध्ये खाणकाम, बिल्डिंगा उभारणे, रस्ते इत्यादी कामे होऊ शकणार आहेत. हा फारच धक्कादायक निर्णय असून त्यामुळे अरवली पर्वताचा ९० टक्के भाग भुईसपाट केला जाऊन तेथे तथाकथित विकासाचे आक्रमण होईल अशी भीती पर्यावरण जाणकारांनी व्यक्त केली आहे. या प्रश्नावर राजस्थान आणि दिल्लीमध्ये सध्या आंदोलने सुरू आहेत. अरवली पर्वत जगातील सर्वात जुन्या पर्वतांपैकी एक असून त्याचे वय सुमारे शंभर कोटी वर्षे असावे. राजस्थान, हरियाणा, दिल्ली व गुजरात या चार राज्यांमध्ये सुमारे सातशे किलोमीटर इतक्या दूरवर या रांगा पसरलेल्या आहेत. त्यातील ५६० एकट्या राजस्थानात आहेत. देशाच्या वायव्येकडे म्हणजे पाकिस्तानच्या दिशेने थरचे वाळवंट असून त्यातून वाऱ्याने सतत उडणारी वाळू अरवली पर्वतरांगांना थडकून थांबवली जात असते. त्यामुळे दिल्ली, हरयाणा तसेच राजस्थानचा मैदानी भाग यांचे संरक्षण होते. अरवली पर्वतामुळेच या भागात पाऊस पडतो. रणथंबोर, सारिस्का, मुकुंद्रा यासारखी वाघांची तीन अभयारण्ये या भागात असून इतरही वीस जंगले इथे आहेत. राजस्थान, गुजरात व हरियाणाची शेती तसेच गाईगुरे याच पर्वतामुळे पडणाऱ्या पावसावर व उगवणाऱ्या चाऱ्यावर अवलंबून आहे. उद्या हा पर्वत कापला जाऊ लागला तर हाहाकार उडू शकतो. पण विकासाच्या कल्पनांनी आंधळे झालेल्यांना याची पर्वा नाही.

## ९० टक्के भाग जाणार

या पर्वतरांगांमध्ये खूप आधीपासूनच या तथाकथित विकासवाल्यांचा हैदोस चालू आहे. शेकडो चौरस किलोमीटर क्षेत्रातील पर्वत यांनी आधीच नष्ट केला आहे. दगड तसेच वाळू उकरण्यासाठी टेकड्या व डोंगरांना भगदाडे पाडली आहेत. याखेरीज ग्रॅनाईट, चुनखडी, संगमरवर इत्यादींसाठीही खोदाखोद चालू आहे. त्याला आक्षेप घेणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल आहेत. त्यांची दखल घेऊन किती उंचीवरच्या टेकड्यांना संरक्षण दिले जायला हवे हे निश्चित करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला एक समिती नेमण्याचे आदेश दिले. केंद्रीय पर्यावरण खात्याने नेमलेल्या या समितीचा अहवाल २० नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायालयापुढे आला व त्यातील व्याख्या न्यायमूर्तींनी स्वीकारली. त्यानुसार शंभर मीटरहून अधिक उंच असतील तरच ते डोंगर वा टेकड्या या पर्वतरांगा मानल्या जातील असे ठरले. म्हणजेच त्याखालच्या टेकड्या पर्वताच्या व्याख्येतून बाद झाल्या. फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडियाने केलेल्या सर्वेक्षण व अभ्यासानुसार अरवलीमधील ९० टक्के पर्वतरांगा या व्याख्येत न बसणाऱ्या म्हणजेच २० ते १०० मीटर उंचीच्या आहेत. पर्वताच्या ९० टक्के भागात विकास करायचा असेल तर पर्यावरणाची परवानगी लागणार नाही असा त्याचा अर्थ होतो. हे अर्थातच धडकी भरवणारे आहे. कारण ठिकठिकाणचे बिल्डर, कंत्राटदार यांना हेच हवे असते. खाणी खोदणाऱ्यांना सरकारचा जाच नको असतो. रस्ते बांधणाऱ्यांना वाटेल तशी तोडफोड करायची असते. नवी व्याख्या मान्य झाली की या सगळ्यांना वाटेल तसा हैदोस घालण्याची परवानगी मिळणार. मोदी सरकारचे मंत्री आकड्यांची बनवाबनवी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण त्यावर कोणाचाच विश्वास नाही. दिल्लीनजीकचे गुरुग्राम किंवा राजस्थानकडचा भाग हा बऱ्यापैकी हिरवा होता. तेथील डोंगर, झाडे तुटली आहेत. दिल्ली ही जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर आहे. हिवाळ्यात तर या प्रदूषणाचा कहर गाठला जातो. तेथे हवेत प्रदूषित वायू व धूळ यांची संख्य सुसह्य पातळीच्या कित्येक पट अधिक आहे.

## सह्याद्रीला धडा

अरवलीच्या पर्वतरांगा तुटल्या तर थरच्या वाळवंटातील वाळू विनाअडसर, दिल्ली, राजस्थान, गुजरातमध्ये दाखल होणार आहे. शिवाय, पावसाचे पडणारे पाणी रोखण्यासाठी अडथळे संपणार आहेत. राजस्थानच्या काही भागात यापूर्वीच भूजल पातळी दोन हजार फुटांपर्यंत खोल खाली गेली आहे. पावसाचे मान अनियमित झाले आहे. हरियाणातील चरखी दादरी किंवा भिवानीच्या टेकड्या गेल्या वीसेक वर्षात लोकांच्या डोळ्यादेखत कापल्या गेल्या आहेत. या भागातील पाणी अतिशय जड आहे. दिल्लीमध्ये साध्या नळाचे पाणी कोणीही पिऊच शकत नाही. त्याचे रिव्हर्स ऑसमॉसिस करून घ्यावे लागते. तसे यंत्र प्रत्येक घरात बसवावे लागते. हे यंत्र अशुध्द असे काळे पाणी बाहेर काढते. ते पाहूनच अंगावर काटा येतो. आता हेच पाणी आणखी प्रदूषित होण्याचा धोका आहे. दुर्दैवाने पर्यावरणाचे असे प्रश्न म्हणजे आपल्या समाजाला अजून जवळचे वाटत नाहीत. शंभर दोनशे वर्षांनंतर पाणी आटणार आहे तर का चिंता करा असे त्याला वाटते. किंवा, पैसा हे सगळ्या प्रश्नांवरचे उत्तर वाटते. आम्ही पैसे टाकून बाटलीबंद पाणी विकत घेऊ, इथली शेती संपली तर परदेशातून धान्य आयात करून खाऊ असे काहीतरी लोकांच्या डोक्यात असते. आजच चटके बसले तरच ते ताळ्यावर येतात. दिल्लीत सध्या प्रदूषणाने कहर केलेला आहे. त्यामुळे तेथे अरवलीचे डोंगर तुटले तर काय होईल याची भीती निर्माण झाली आहे. लोक किमान या प्रश्नावर बोलू लागले आहेत. आपल्याकडे पावसाळ्यात माळीण किंवा इरशाळगडसारख्या दुर्घटना घडल्या की जनता तात्पुरती जागी होती. पण नंतर लगेचच सह्याद्रीचे डोंगर कापण्याला दुप्पट वेगाने सुरुवात होते. आता मुंबई ते पुणे दरम्यान आणखी एक नवा सुपरफास्ट रस्ता तयार व्हायचा आहे. त्यासाठी खंडाळ्याच्या घाटातील डोंगरांची कत्तल होणार आहे. याचे भीषण परिणाम येत्या काळात खोपोली व खालच्या परिसराला भोगावे लागू शकतात. अन्ननलिकेला आजार झाला तर पोटाची आतडी थेट गळ्याशी भिडवण्याची शस्त्रक्रिया केली जाते. किंवा घशाला वा पोटाला बाहेरून भोक पाडून अन्न टाकण्याचीही क्वचित व्यवस्था होते. पण हे इलाज म्हणजे अगदीच नाइलाजाने करण्याचे उपाय असतात. त्याने आपले शरीर कधीच पूर्ववत होत नसते. त्याचे व्हायचे ते दुष्परिणाम होतातच. अरवली काय किंवा सह्याद्री काय, विकासाच्या नावाखाली कापून काढण्याचे दुष्परिणाम होतातच. सृष्टीची ही रचना लाखो वर्षांच्या उलथापालथीतून नैसर्गिक रीत्या तयार झालेली असते. ती बिघडवली की दुरुस्त करता येत नाही. त्यासाठीच अरवलीची लढाई दिल्लीसाठीच नव्हे तर महाराष्ट्रासाठीही महत्वाची आहे.

**विचार**

# महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व डॉ मनमोहन सिंग

*भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांची आज पुण्यतिथी. दोन वर्षापूर्वी २६ डिसेंबर २०२४ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपला. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्थव्यवस्था सुदृढ झाली आहे.*

**श्याम ठाणेदार**



डॉ मनमोहन सिंग हे रूढ अर्थाने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृ छत्र हरपले. घरची परिस्थिती हालाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्या वर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान त्यांनी युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लगार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले.

१९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टण सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यानच राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंह राव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तींचे नावे सुचवा तेंव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहीतासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माझ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले.

देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींनी आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले.

देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ मनमोहन सिंग यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

# जिल्हा 'अनधिकृत' विळख्यात जखडतोय

**संतोष राऊळ**

रायगड जिल्ह्याला पर्यटनासाठी अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. येथील समुद्रकिनारा, नद्या, डोंगर आणि नारळी-पोफळीच्या बागांसह येथील खाद्य संस्कृती राज्यभरातील पर्यटकांच्या पसंतीस उतरत आहे. तसेच, मुंबईकडून येणाऱ्या पर्यटकांना रायगड जिल्ह्यात पर्यटनासाठी येणे सोयीचे देखील ठरत आहे. त्यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे होताना दिसत आहे. सध्या जिल्ह्यात औद्योगिक विकास देखील मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण, अलिबागसह जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील जमिनींना देखील सोन्यापेक्षाही महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रिसॉर्ट, कॉटेजेस, बंगलो, टोलेजंग इमारती त्याचबरोबर मोठंमोठे कारखाने, औद्योगिक वसाहती यांच्यात वाढ होताना दिसत आहे. तसेच, वाढत्या नागरिकरणामुळे या सर्व गोष्टी होणं साहजिकचं आहे. त्यासाठी सरकाने अनेक विकास कामे देखील हाती घेतली आहेत. परंतु, या विकास कामांमुळे अनधिकृत बांधकामे देखील फोफावत चालली आहेत. सरकारी आकडे आणि प्रत्यक्षात केलेली कारवाई यांच्यात तफावत असल्याची चर्चा देखील सामाजिक कार्यकर्त्यांमधून होत आहे. तसेच, अशा ठिकाणी अनधिकृत पणे बेकायदा व्यवसाय देखील चालवले जातात. त्यामुळे रायगड जिल्हा अनधिकृत बांधकामांच्या विळख्यात जखडत जात असल्याचे सर्वसामान्यांमधून बालले जात आहे.



सध्या रायगड जिल्ह्यातील अनधिकृत किंवा विनापरवाना बांधकामांची आणि त्यावर केलेल्या कारवाईंची आकडेवारी समोर येत आहे. त्यात कागदोपत्री १० हजार ६५३ एवढी बांधकामे असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यांच्याकडून ७ कोटी ९६ लाख रूपयांचा दंड वसूल करण्यात आल्याचे महसूल विभागाने सांगितले आहे. ही अनधिकृत बांधकामे शेतजमिनी, गुरचरण आणि सरकारी जागांवर करण्यात आली आहेत. महसूल विभागाने जरी काही प्रमाणात वसूल केला असला तरी उर्वरित ३९ कोटी ५० लाख ९१ हजरी ७ रुपयांचा दंड वसूल करण्यास ही यंत्रणा उदासीन ठरल्याचे देखील समोर येत आहे. दरम्यान, उर्वरित दंड तर वसूल कराच पण दंड वसूल केल्यानंतर संबंधित बांधकामांना अभय न देता त्यांना त्याचवेळी जमिनदोस्त करा, अशा प्रतिक्रीया स्थानिक स्तरावरून उमटत आहेत.

रायगड जिल्ह्यातील उरण तालुका हा तिसऱ्या मुंबईकडे वळतानाचे चित्र सध्या दिसत आहे. गुरूवारपासून उरण नजिक असलेले नवी मुंबई विमानतळ सुरू झाल्यामुळे उरण तालुक्याला देखील अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त झाले आहे. खरंतर उरण तालुका खुप आधिपासूनच येथील औद्योगिक कारखाने आणि जेएनपीटी बंदरासारख्या उद्योगांमुळे नावारूपाला आला आहे. त्यात दिवसेंदिवस नवंनव्या उद्योगांची स्थापना याठिकाणी होत आहे. त्यामुळे येथील नागरिकरण देखील झपाट्याने वाढत चालले आहे. त्यामुळे त्यांच्या राहण्याचा प्रश्न देखील गंभीर होत चालला आहे. दरम्यान, उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत असल्याची चर्चा स्थानिकांमधून होत आहे. येथील नागरिक व सामाजिक कार्यकर्ते वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करूनदेखील त्याकडे जाणिपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे त्यांच्याकडून बोलले जात आहे. या ठिकाणी कोणतीही परवानगी न घेतो टोलेजंग इमारती बांधल्या जात आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणात निसर्गाशी छेडछाड केली जात आहे. येथील बहुतांश डोंगर विकासाच्या नावाखाली भुईसपाट करण्यात आले आहेत. तसेच, कांदळवने देखील बुजवली जात आहेत. हिच परिस्थती पनवेलसह अलिबाग आणि इतर तालुक्यांत आहे. भविष्यात देखील असेच सुरू राहिल्यास संपूर्ण जिल्हा अनधिकृत बांधकामांच्या विळख्यात जखडून होणाऱ्या परिणामांना भोगावे लागण्याची भिती जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे महसुल विभागाने अनधिकृत बांधकांवर फक्त आर्थिक कारवाई न करता त्यासोबतच तोडक कारवाई करणे गरजेचे आहे. तसे होत नसेल तर कुठेतरी पाणी मुरत असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. कारण अश्या ठिकाणी अनधिकृत व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात चालवले जातात. त्यामुळे त्याचे परिणम लहान मुलांसह तरूणाईवर होताना दिसत आहे. तसेच, बांधकाम अधिकृत असो वा अनधिकृत, त्यातून माणसांसह निसर्गालाही धक्का बसत नाही ना, याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. उद्या एखादी गंभीर परिस्थिती उद्भवली तर हेच अधिकारी अनधिकृत पणे मिळवलेल्या पैशांतून दुसरीकडे पलायन करतील. परंतु, स्थानिकांचे काय? ते कुठे जाणार? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे जिल्हाला अनधिकृत बांधकामांसह अनधिकृत व्यवसायांच्या विळख्यातून सोडविले नाही तर रायगडचा उडता पंजाब व्हायला वेळ लागणार नाही, असे देखील जाणकारांकडून बोलले जात आहे.

**लोकसंसद**

## अरवलीत नव्या खाणपट्ट्यांवर पूर्णतः बंदीचा योग्य निर्णय



दिल्ली, हरियाणा, राजस्थान आणि गुजरात या राज्यात पसरलेल्या अरवली पर्वतरांगांमध्ये नवीन खाणपट्टे देण्यावर संपूर्ण बंदी घालण्याचे आदेश केंद्र सरकारने या राज्यांना नुकतेच दिले. अवैध व अनियंत्रित खाणकाम थांबवणे, संरक्षित क्षेत्रांचा विस्तार करणे, सध्या चालू असलेल्या खाणींसाठी कठोर नियम निश्चित करणे, भूजल पातळीला आधार देणे, वाळवंटीकरणाला अडथळा निर्माण करणे व एकूणच अरवली पर्वतरांगांमधील जैवविविधतेचे, परिसंस्थेचे संरक्षण करणे या उद्देशाने हे आदेश देण्यात आले आहेत. अरवली पर्वतरांगेला एक सलग पर्यावरणीय वैशिष्ट्य म्हणून जतन करण्याचे उद्दिष्ट असून ही बंदी दिल्ली ते गुजरातपर्यंतच्या संपूर्ण अरवली प्रदेशात लागू करण्यात आली आहे. केंद्र सरकारने अलीकडेच अरवली पर्वतरांगांसंदर्भात परिभाषित केलेल्या 'फक्त १०० मीटर किंवा त्याहून अधिक उंची असलेल्या टेकड्या आणि एकमेकांपासून ५०० मीटरच्या आत असलेल्या अशा दोन किंवा अधिक टेकड्यांचा समूह' अरवली पर्वतरांगा मानल्या जातील' या नवीन वैज्ञानिक व्याख्येमुळे अरवलीच्या बहुतांश ठिकाणी खाणकाम उत्खननाचा मार्ग मोकळा होणार होता. हिमालयापेक्षाही जुन्या असलेल्या या पर्वतरांगा या निर्णयामुळे उद्ध्वस्त होण्याची साधार भीती निर्माण झाली. त्यामुळे प्रचंड जनप्रक्षोभ होऊन देशभर 'अरवली वाचवा' आंदोलन उभे राहिले. त्याची वेळीच दखल घेऊन केंद्र सरकारने अरवलीत नव्या खाणपट्ट्यांवर पूर्णतः बंदी घातल्याचा योग्य निर्णय घेतला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

**दिनविशेष**

# असा अर्थमंत्री पुन्हा होणे नाही, माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह

पंतप्रधान, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंह यांचं दोन वर्षापूर्वी २६ डिसेंबर २०२४ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपला. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मनमोहन सिंह यांनी देशाला यशाच्या एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं. मनमोहन सिंह यांनी १९९१ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री असताना उदारीकरणाचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक ठरला. त्यांच्या या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्था एका वेगळ्या उंचीवर गेली. मनमोहन सिंह यांच्या उदारीकरणाच्या निर्णयाने देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकट केलं. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वळणाचे जनक म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांना ओळखले जाते. डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताचे १४ वे पंतप्रधान होते. डॉ. मनमोहन सिंग हे एक विचारवंत आणि अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांचा कामाप्रती असलेला शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता आणि विनम्र आचरणामुळे ते कायमच चर्चेत असायचे. पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा जन्म २६ सप्टेंबर १९३२ रोजी अखंड भारताच्या पंजाब प्रांतातील एका खेड्यात झाला. डॉ. मनमोहन सिंग यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर १९५७ साली त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. यानंतर १९६२ साली डॉ. मनमोहन सिंग यांनी ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी फील संपादन केली. डॉ. मनमोहन सिंग यांनी पंजाब विद्यापीठ आणि दिल्ली स्कूल ऑफ इकोनोमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी युएनसीटीएडी सचिवालयात काही काळ काम केले. यानंतर १९८७ आणि १९९० या काळात त्यांची जीनिव्हा येथील साऊथ कमिशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. डॉ. मनमोहन सिंग यांनी १९७१ साली वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून जबाबदारी स्वीकारली. यानंतर १९७२ साली डॉ. मनमोहन सिंग यांची अर्थमंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली. डॉ. मनमोहन सिंह हे भारताचे चौदावे पंतप्रधान झाले होते. डॉ. मनमोहन सिंह हे नम्रता, कठोर परिश्रम आणि कामाप्रती बांधिलकी यासाठी ओळखले जातात. मनमोहन सिंह १९७१ मध्ये वाणिज्य मंत्रालयात आर्थिक सल्लागार म्हणून रुजू झाले होते. १९७२ मध्ये त्यांची अर्थ मंत्रालयात मुख्य आर्थिक सल्लागार म्हणून नियुक्ती झाली होती. मनमोहन सिंह १९९१ ते १९९६ पर्यंत भारताचे अर्थमंत्री होते. देशाच्या आर्थिक जडणघडणीसाठी हा काळ अत्यंत महत्त्वाचा होता. ते २००४ साली भारताचे पंतप्रदान झाले. त्यानंतर २००९ साली दुसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान झाले. ते सलग १० वर्ष भारताचे पंतप्रधान होते.

देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**स्वरा संजय बोर्लीकर, अलिबाग**

**स्व. प्रभाकर सवाखंडे, स्मरणार्थ अलिबाग**

# उत्तरकार्याला पार्किंगची अडकाठी

## नगर परिषदेकडून कारवाई करण्यास टाळाटाळ

**। श्रीवर्धनन। प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहरामध्ये मठाच्या स्मशानभूमी जवळ अवधूत मंदिर आहे. या अवधूत मंदिराचा परिसर जवळजवळ ९६ गुंठे इतका आहे. हा सर्व परिसर श्रीवर्धन शहरातील मृत पावलेल्या नागरिकांच्या उत्तरकार्यासाठी राखीव ठेवलेला आहे. या ठिकाणी दहावे, बारावे त्याचप्रमाणे सर्व प्रकारची उत्तरकार्य केली जातात. परंतु, दिवसेंदिवस वाढणाऱ्या पर्यटनामुळे श्रीवर्धनमध्ये सहलीच्या येणाऱ्या बसेसची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे पार्किंगची समस्या गंभीर झालेली आहे. याच अवधूत मंदिर परिसरात सहलीच्या असंख्य बस पार्किंग करून ठेवलेल्या असतात. त्यामुळे शहरात कोणत्याही नागरिकाचे मयत झाल्यानंतर उत्तरकार्य करण्यामध्ये अडचण निर्माण होत आहे.

अवधूत मंदिर परिसरात सहल आयोजक बिनधास्तपणे जेवण बनवताना अनेक वेळा आढळून येतात. जेवण बनवून झाल्यानंतर त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची साफसफाई करण्यात येत नाही. या ठिकाणी येणाऱ्या सहलींच्या बसेसमुळे व जेवण बनवण्याच्या प्रकारामुळे मंदिराचे पावित्र्य धोक्यात आले आहे. श्रीवर्धनमधील अतिशय जागरूक असे हे अवधूत देवस्थान आहे. याबाबत नगरपरिषदेचे अगोदर असलेले मुख्याधिकारी व आत्ता असलेले मुख्याधिकारी यांच्याकडे अनेक वेळा चर्चा करून त्या ठिकाणी सूचनाफलक लावावा याबाबत सूचना दिल्या आहेत.



मात्र, नगर परिषदेकडून अशी कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. एकूणच संपूर्ण शहरामध्ये पार्किंगची समस्या अत्यंत गंभीर बनलेली असून समुद्रकिनारी असलेल्या अनेक हॉटेल्स व रिसॉर्टला कस्टमर पोहोचू शकत नाहीत. कारण समुद्राकडे येणाऱ्या रस्त्याच्या दुतर्फा चार चाकी वाहने पार्किंग केल्यामुळे संपूर्ण रस्ता जाम होऊन गेलेला असतो. काही दिवसापूर्वी र.ना. राऊत विद्यालयाच्या मागील पटांगणामध्ये तात्पुरती पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. परंतु शाळा प्रशासनाने या ठिकाणी चर खणल्यामुळे त्या ठिकाणचे पार्किंग बंद करण्यात आले आहे.

नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारची पार्किंगची सुविधा येणाऱ्या पर्यटकांसाठी उपलब्ध करून दिली जात नाही. पर्यटकांकडून पर्यटन कर वसूल केला जातो. परंतु त्यांना सुविधा शून्य प्रमाणात दिल्या जातात. याबाबत श्रीवर्धनच्या आ. अदिती तटकरे यांच्याजवळ देखील अनेक वेळा चर्चा करून सुद्धा या प्रकारावरती अद्याप तोडगा निघालेला नाही. समुद्रकिनारी सुशोभीकरण केलेल्या बंधाऱ्याच्या बाजूला हेलीपॅड आहे. या हेलीपॅडच्या परिसरामध्ये चार ते पाच एकर जागा वनखात्याच्या अखत्यारीतील मोकळीच आहे. या जागेवर पे अ‍ॅण्ड पार्कची सुविधा नगरपरिषद व वनखात्याने संयुक्तपणे करून द्यावी अशी नागरिकांची मागणी आहे.

### पार्किंगची मागणी

**श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या प्रकरणी गांभीर्याने लक्ष देऊन पार्किंगची सुविधा तातडीने उपलब्ध करून द्यावी अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.**

## भटके श्वान नियंत्रण सभेचे आयोजन

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी।**

गेल्या काही दिवसांपासून भटक्या कुत्र्यांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. त्या अनुशंघाने भटके श्वान नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त रायगड डॉ. सचिन देशपांडे यांच्या दिलेल्या सूचनेनुसार गटविकास अधिकारी पनवेल समीर वाठारकर व सहाय्यक आयुक्त डॉ. समीर तोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती पनवेल येथे सभा घेण्यात आली. या सभेमध्ये भटके श्वान नियंत्रण कार्यक्रमात अंतर्गत सुप्रीम कोर्ट यांच्या आदेशाची, नगर विकास विभाग यांचे परिपत्रक, ग्रामविकास विभाग यांच्या परिपत्रक तसेच एडब्ल्यूबीआय मार्फत जारी झालेल्या एसओपी पत्रकाचे सविस्तर वाचन करून माहिती सर्व ग्राम विकास अधिकारी यांना प्रत्यक्षात देण्यात आली. तसेच ग्रामपंचायत पातळीवर भटके श्वान नियंत्रण कमिटी स्थापन करण्याच्या सविस्तर सूचना व मार्गदर्शनवरील सर्व परिपत्रकाचे वाचन करून डॉ. आनंद मारकवार पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती पनवेल यांनी सर्व उपस्थित ग्रामविकास अधिकारी यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## दत्तात्रेय पाटील यांचे निधन

**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील रांजणखार येथील दत्तात्रेय गणू पाटील यांचे मंगळवार (दि.१६) डिसेंबर रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी हृदय विकाराच्या झटक्याने एम.जी एम कळंबोली येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भुवनेश्वर येथील वैकुंठधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुन,नातवंड असा मोठा परिवार आहे.



## सुधागड तालुका मराठा समाजातर्फे मार्गदर्शन



**। पाली । प्रतिनिधी ।**

पाली येथील सुधागड तालुका मराठा समाज या संस्थेच्या वतीने ९ वी ते १२ वी पर्यंतच्या तालुक्यातील सर्व जाती धर्मातील विद्यार्थ्यांसाठी १० वी व १२ वी नंतरच्या करिअरच्या वेगवेगळ्या वाटा समजून घेण्यासाठी आयोजित केलेले विनामूल्य मार्गदर्शन शिबिर नुकतेच संपन्न झाले.

याप्रसंगी पुणे येथील प्रसिद्ध लेखक विवेक वेलणकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे विद्यार्थी व पालकांच्या विविध शंकांचे निरसन केले. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना १० वी व १२ वी नंतरचे अनेक नवीन शैक्षणिक अभ्यासक्रम व पर्याय याची माहिती झाली.

शिबीर स्वर्गीय सटुराम सखाराम साजेकर सभागृहात संस्थेचे अध्यक्ष धनंजय सटुराम साजेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. याप्रसंगी विशाखा वेलणकर, संस्थेचे कार्याध्यक्ष निंबाळकर, सुजित बारसकर, प्रा. भोईर, समिती सदस्य तसेच मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते. सतिश हुले यांनी सूत्रसंचालन तर जयवंत दंत यांनी आभार प्रदर्शन केले.

सुधागड तालुका मराठा समाज ही संस्था तालुक्यातील सर्व जाती धर्मातील लोकांसाठी घेऊन विविध उपक्रम राबवीत असल्याने संस्थेचे अध्यक्ष व सर्व संचालक मंडळ यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## प्रशांत सोनवणे यांची निवड

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीच्या पनवेल शहर अध्यक्षपदी प्रशांत सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशांत सोनवणे यांची पनवेल शहर अध्यक्षपदी निवड केली आहे व तशा प्रकारचे नियुक्तीपत्र त्यांनी प्रशांत सोनवणे यांना दिलेले आहे. त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीकरता शुभेच्छा दिलेल्या आहेत.



## रोह्यात विम्याच्या पैशांपासून शेतकरी वंचित

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील फळ बागायतदार शेतकरी वर्गाला विम्याचे पैसे अद्याप मिळाले नाहीत. पैशांसाठी शेतकरी वर्गाची प्रतिक्षा काही संपत नसून बागायतदार शेतकरी वर्गाचा पुरता भ्रमनिरास झाला आहे. दोन वर्षांपूर्वी अवकाळी व बदललेले हवामानामुळे बागायतदारांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या बागायती शेतीचे शासकीय पंचनामे झाल्यानंतर नुकसान भरपाई विम्याचे पैसे लवकरच मिळतील अशी आशा होती. परंतु वर्ष उलटून गेले तरी अद्याप नुकसान भरपाई विम्याचे पैसे मिळाले नसल्याने शेतकरी वर्ग पुरता निराश झाला आहे. तालुक्यातील निडीतर्फे अष्टमी व आंबेवाडी-कोलाड हे दोन मंडळ वगळता बाकी जवळपास सर्वच मंडळातील शेतकरी वर्गाला विम्याचे पैसे मिळाले असल्याने निडीतर्फे अष्टमी व आंबेवाडी-कोलाड या दोन मंडळातीलच शेतकरी वर्गावर अन्याय का, असा सवाल उपस्थित केला आहे.

## महिलांचे आरोग्यविषयक प्रशिक्षण संपन्न

**। मुरुड जंजिरा। प्रतिनिधी ।**

प्राचार्य डॉ. साजिद शेख व ला. मकरंद कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब ऑफ मुरुड-जंजिरा व लायन्स क्लब ऑफ श्रीबाग यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा येथे तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ-नवी मुंबई यांच्या सहकार्याने इंग्लाइफलाइन स्किल्स कार्यशाळेद्वारे महिलांचे आरोग्यविषयक या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील १०० विद्यार्थी व मुरुड तालुक्यातील ३५ आशा सेविकांनी प्राची चौलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला.

या प्रशिक्षणादरम्यान डॉ. अजय बाल्की यांनी मानसिक आरोग्याचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन, भावनिक संतुलन व सकारात्मक जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले. स्पर्धात्मक जीवनात मानसिक स्थैर्य जपणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला. डॉ. वृती शेठ व डॉ. पद्मजा यांनी महिलांचे आरोग्य व त्यांना भेडसावणाऱ्या समस्या या विषयावर संवाद साधत आरोग्यविषयक जागरूकता निर्माण केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लायन्स क्लब मुरुडचे सनी सोगावकर, तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉक्टर व पॅरामेडिकल टीम, डॉ. फिरोज शेख, प्रा. अल्ताफ फकीर, प्रा. तमसील शहाजहान तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## झुगरेवाडीत विविध स्पर्धांचे आयोजन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या झुगरे वाडी शाळेत रीलस्टार मयुरेश गुजर यांचा जन्मदिवस साजरा केला. यावेळी झुगरे वाडी येथे रामानुजन यांच्या जीवनावर आधारित विविध प्रकारच्या स्पर्धांचे घेतल्या. तसेच चित्रकला स्पर्धा, पाढे पाठांतर, रांगोळी स्पर्धा, मणी, खडे यांचे साह्यायाने विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या, यात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला, दर्शना ठोंबरे, रोहिणा वाघ, सोनल हुमणे, ललिता पारधी, मोनिका पारधी, राधिका निरगुडा, वेदांत म्हात्रे, समीर पारधी, दुर्गेश पारधी, संग्राम खडके, या सर्व विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वी केला, मुख्याध्यापक रवी काजळे, राजश्री पाटील, जनार्धन निरगुडा, लक्ष्मण पादीर आणि सर्व विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते, विजेत्या स्पर्धकांना रीलस्टार मयुरेश गुजर, तन्मय बुरम, अनिष, सिद्धेश यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

## भुवनेश्वर ते बारसोली रस्त्याची मागणी

**। रोहा । प्रतिनिधी ।**

पर्यावरण, शेतीसह समाजाच्या हितासाठी लढणाऱ्या बळीराजा फाऊंडेशन संस्थेने भुवनेश्वर ते बारसोली रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. वारंवार मागणी, तक्रारी करूनही रस्त्याची साईडपट्टी भरण्यात आली नाही. अनेक ठिकाणी रस्ता नादुरुस्त झाला आहे. यातून रस्ता खड्डे मुक्त व्हावा, दुतर्फा साईडपट्टी रस्त्याचा गवत काढावा, साकाव दुरुस्त करावे, वरसे भागातील गणेशनगर झोपडपट्टीतील रस्त्याचे खड्डे भरावेत, अशा आशायाचे निवेदन बळीराजा फाऊंडेशनच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विजय बागुल यांना देण्यात आले.



उपविभागीय अभियंता विजय बागुल यांच्याशी शिष्टमंडळाने सविस्तर चर्चा केली. तातडीने साईडपट्टी भरणे, झाडांतील गवत साफ करणे, खड्डे भरण्याचा काम तातडीने पूर्ण केला जाईल असे बागुल यांनी शिष्टमंडळाला आश्वासित केले. तसेच रस्ता दुरुस्ती तातडीने केली जाईल असे आश्वासन बांधकाम प्रशासनाने दिल्याने रस्त्याची दुरुस्ती तातडीने सुरू होईल अशी अपेक्षा अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी व्यक्त केले. यावेळी अध्यक्ष विठ्ठल मोरे, राजेंद्र जाधव, अ‍ॅड. दीपक भगत, रुपेश साळवी, संजय भगत, जनार्दन ढेबे, नितेश बामुगडे, जयवंत शिगवण, महेंद्र मोरे, उद्धव आव्हाड, महेश मोहिते, ज्ञानेश्वर चंद्रवंशी आदी उपस्थित होते.

**दोनशेहून अधिक विद्यार्थी सहभागी | शिक्षण विभागाचे उत्तम आयोजन**

# विज्ञान प्रदर्शन विज्ञानपूरक स्पर्धा

**। नेरळ, । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात ५३ व्या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी अनेक विज्ञान प्रतिकृती प्रदर्शनात मांडल्या होत्या. मात्र, विद्यार्थ्यांना विज्ञान पुरक स्पर्धांचा अनुभव यावा आणि स्पर्धेत यश मिळविण्यासाठी पाया मजबूत असावा यासाठी अनेक विज्ञान पुरक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.रंगभरण, वक्तृत्व, प्रश्न मंजुषा या स्पर्धांमध्ये ३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

नेरळ येथील शार्विल स्कूलमध्ये कर्जत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. कर्जत पंचायत समिती शिक्षण विभागाच्या माध्यमातून आयोजित या विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी तसेच माध्यमिक शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन गटांमध्ये रंगभरण, वक्तृत्व, निबंध आणि प्रश्न मंजुषा या स्पर्धा घेण्यात आल्या. प्रश्न मंजुषा स्पर्धेला दोनशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.




**स्पर्धेचे निकाल**

रंगभरण स्पर्धा लहान गट प्रथम साक्षी पाटील, राजिप बोरगाव, द्वितीय जुल्फिकार, राजीप उर्दू नेरळ, तृतीय साई निशा भोईर, राजिप पोही, उत्तेजनार्थ. पार्श्व पाटील, गीता घारे शाळा खांडपे वक्तृत्व स्पर्धा प्राथमिक विभाग प्रथम क्रमांक मनाली येमगेकर, नेरळ विद्या मंदिर नेरळ द्वितीय क्रमांक समृद्धी जयवंत डांगरे, ओंकार माध्यमिक विद्यालय शेलू तृतीय क्रमांक छायांक प्रकाश धुळे, राजिप पाषाणे उत्तेजनार्थ अन्वेष रवी वाघ, राजिप कळंब

**वक्तृत्व माध्यमिक**

प्रथम क्रमांक.. मोनिता प्रफुल्ल बदे,विद्या विकास मंदिर नेरळ द्वितीय क्रमांक आर्या अरुण खडेकर, एल ए इ एस ज्युनियर कॉलेज नेरळ, तृतीय क्रमांक दक्षता डुकरे नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालय नेरळ उत्तेजनार्य किमया गोडबोले डोंबे विद्यालय,दहिवली कर्जत. निबंध स्पर्धा प्राथमिक गट. प्रथम क्रमांक आरुषी किसन घावट, अभिनव ज्ञान मंदिर कर्जत, द्वितीय क्रमांक अंतरा रणजीत भोईर, राजिप भोईरवाडी तृतीय क्रमांक समृद्धी जयवंत डांगरे, ओंकार माध्यमिक विद्यालय शेलू, उत्तेजनार्थ परिना राजाराम धुळे,राजिप भातगाव माध्यमिक गट प्रथम क्रमांक माही ठाकूर, व्ही वाय कोठारी इंग्लिश मिडियम स्कूल नेरळ, द्वितीय क्रमांक ऋग्वेद राऊत, शारदा इंग्लिश मिडियम स्कूल डिकसळ, तृतीय क्रमांक अथर्व राठोड, शारदा इंग्लिश मिडियम स्कूल कर्जत, उत्तेजनार्थ. झिया वाकणी, हाजी लियाकत इंग्लिश मिडियम स्कूल नेरळ प्रश्नमंजुषा स्पर्धा प्राथमिक गट प्रथम क्रमांक. स्वरा गायकवाड, सैफ कयामुल अन्सारी माथेरान व्हॅली इंग्लिश मिडियम स्कूल वंजारपाडा, द्वितीय क्रमांक. अंतरा भोईर, हितेश्री ठोंबरे राजिप भोईरवाडी तृतीय क्रमांक अंकिता गिरा, जय राणे राजिप देवपाडा, माध्यमिक गट प्रथम क्रमांक श्रावणी पाटील, सोनाली शेळके शेंडे पाटील माध्यमिक विद्यालय भडवळ, द्वितीय क्रमांक दिशांत भोईर, अनुराधा कुशवाहा माथेरान व्हॅली इंग्लिश मिडियम स्कूल वंजारपाडा, तृतीय क्रमांक मोनिता बदे, देविका कर्णिक विद्या विकास मंदिर नेरळ. शिक्षक प्रतिकृती प्राथमिक देविदास वसावे राजिप भडवळ, सचिन जोशी,राजिप काठेवाडी, रामदास बोबटे,राजिप बारणे यांना देण्यात आला.

## निवडक



### वाहतूक पोलिसांमुळे अनर्थ टळला

**पनवेल :** जेएनपीटी रोडवरील मानघर ब्रिजच्यावर पिकअप आणि डंपरमध्ये भीषण अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीचा खोळंबा झाला होता. मात्र, पोलीस प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला असून वाहतूक पुन्हा एकदा पूर्ववत करण्यात आली आहे. सदर अपघात घडल्यानंतर पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यामध्ये पोलीस हवालदार ज्ञानेश्वर पवार, पोलीस हवालदार यादव, पोलीस हवालदार पवार, पोलीस नाईक केशव निकम आणि एमएसएफच्या जवानांनी अत्यंत कौशल्याने परिस्थिती हाताळली. अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या मध्यभागी असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला होता, त्यामुळे क्रेन पाचारण करण्यात आली. क्रेनच्या साहाय्याने ही अपघातग्रस्त वाहने बाजूला करून पोलिसांनी रस्त्यावरील अडथळा दूर केला आणि विस्कळीत झालेली वाहतूक तात्काळ सुरळीत केली.

### टिळक विद्यालयात आठवडा बाजार



**खरोशी :** पेण एज्युकेशन सोसायटीच्या वावोशी येथील नाना टिळक प्राथमिक विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरविण्यात आला. आठवड बाजाराचे उद्घाटन सायली पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरण्यात आला होता. यामध्ये खाऊचे स्टॉल स्टेशनरी पालेभाज्या फळभाज्या, भेल, बिस्किटे आदी पदार्थ ठेवण्यात आले होते. कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या घरत यांच्या नेतृत्वाखाली शालेय शिक्षक मानसी केदारे, सुनील पवार, आरती पाटील, रिया वालम, विद्या शेट्ये, सुलभा राजपूरकर, रंजना भऊड, आदींसह पालक शाळा व्यवस्थापन समिती आजी-माजी पालक यांनी विशेष सहकार्य केले.याप्रसंगी आरती म्हात्रे, श्रीकांत चव्हाण, प्रियंका साळुंखे, अविनाश दोंदे, अनंत गायकवाड, संतोष गायकवाड, कांचन सावंत, सुविधा, अश्विनी गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.



### पोटफोडे विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम

**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्री.रा.ग.पोटफोडे(मास्तर) विद्यालय खांब व द.ग.तटकरे कनिष्ठ महाविद्यालय खांब येथे सांस्कृतिक व विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम (दि.२४) रोजी करण्यात आले. संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रम पाहण्यासाठी विभागातून मोठ्या संख्येने रसिक प्रेक्षक व विद्यार्थी वर्गाचे पालक तसेच आजी माजी विद्यार्थी यांनी मोठी गर्दी केली होती. याप्रसंगी संस्थेचे संचालक रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, वसंत मरवडे, सुरेखा पारटे, किसन भोसले, नरेंद्र माळी, आर. जी. म्हात्रे, सुप्रिया क्षिरसागर, अभिजित वरखले, विलास कांबळे, नंदकुमार कलमकर, शुभम राजशिर्के, जितेश पारटे, आदिती राजेशिर्के, सुरेश जंगम, दिपक जगताप प्रमुख आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



### बांठियामध्ये आंतर शालेय स्पर्धा

**पनवेल :** लायन्स पनवेल सरगमतर्फे आंतर शालेय कराओके गायन स्पर्धा नुकत्याच बांठिया हायस्कूलचे सभागृहामध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. इ.४, इ. ५ ते ७ आणि इ. ८ ते १० या ३ गटांमध्ये आयोजित आंतर शालेय कराओके स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेमध्ये सर्वात लहान स्पर्धक रूही राऊत या स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरली. या कार्यक्रमामध्ये विजेत्यांना नमिता मिश्रा यांचे हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील विजेत्याना सरगम कराओके लिट्ल स्टार ही आकर्षक ट्रॉफी आणि रोख पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेत इ. ४ पर्यंत प्रथम क्रमांक - कैवल्य लोंढे, द्वितीय क्रमांक - प्रेम पाटील, तृतीय क्रमांक - प्रांजल ठाकूर, उत्तेजनार्थ - शौर्य सोनावणे, इ. ५ ते ७ प्रथम क्रमांक - रोहित कुमार, द्वितीय क्रमांक - मार्वी ठाकूर, तृतीय क्रमांक - ओंकार शिंपी, उत्तेजनार्थ - युक्ता भोईर, इ. ८ ते १० प्रथम क्रमांक - विभागून स्वर म्हात्रे आणि श्रीमती मेहता, द्वितीय क्रमांक - तनिषा चव्हाण, तृतीय क्रमांक - रियांक जाधव, उत्तेजनार्थ - देवश्री घोडके, या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून विजय मनोहर आणि सुनील काशीद यांनी काम पाहिले.

### प्रवाशांची गैरसोय होणार कमी

**उरण :** उरण ते नवी मुंबई लोकल सेवेच्या फेऱ्यांमध्ये सोमवारपासून वाढ करण्यात आली आहे. यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय आता कमी होऊ लागली आहे. उरण ते नवी मुंबई लोकल मार्गावर दररोज सुमारे १४ हजार प्रवासी ये-जा करीत असून, उरणहून पहाटे लवकर आणि रात्री उशिराची लोकलसेवा सुरू करण्याची मागणी सातत्याने करण्यात येत होती. सोमवारपासून उरण ते नवी मुंबई दरम्यान लोकलच्या १० फेऱ्या वाढविल्या आहेत. उरण आणि बेलापूर येथून पहाटे ५.३० वाजता पहिली लोकल, रात्री १०.३० वाजता शेवटची रेल्वे सुरू करण्यात आली आहे. नवीन स्थानकांसह १० लोकल फेऱ्या वाढल्यामुळे नवी मुंबईतील रेल्वे प्रवाशांना रेल्वेकडून दोन मोठे गिफ्ट्स मिळाले आहेत. यामुळे प्रवाशांची खूप सोय होणार आहे. या रेल्वे सेवेने उरणचे दळवणवळण वाढले आहे. शिवाय नोकरदार,विद्यार्थ्यांची सोयही झाली आहे.

## निवडक



### ज्येष्ठ नागरिकांचा स्नेहमेळावा

**पनवेल** : पनवेल शहर पोलीस ठाणे येथे परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या मेळाव्यामध्ये जेष्ठ नागरिकांनी उपस्थित केलेल्या सूचनांप्रमाणे पोलीस ठाणे स्तरावर करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. तसेच सायबर सुरक्षा, डिजिटल अरेस्ट यांबाबत मार्गदर्शन करून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहितेमधील ज्येष्ठ नागरिकांच्या अनुषंगाने तरतुदींची देखील माहिती देण्यात आली. यावेळी पोलीस निरिक्षक शाकीर पटेल, अभिजीत अभंग, सहायक पोलीस निरिक्षक राजेंद्र घेवडेकर, प्रज्ञा मुंडे यांच्यासह सुमारे दीडशे ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

### कर्जत गटनेतेपदी संतोष पाटील



**नेरळ** : कर्जत नगरपरिषदेच्या सत्ताधारी कर्जत परिवर्तन आघाडीतील शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या गटनेतेपदी नगरसेवक संतोष पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कर्जत नगरपरिषदेत शिवसेनेचे ४ आणि पुरस्कृत १ असे पाच नगरसेवक निवडून आले आहेत. या सर्व नगरसेवकांनी संतोष पाटील यांची गटनेते म्हणून निवड केली. शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या या सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींची बैठक कर्जत येथील शिवालय व जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांची निवड करण्यात आली. यावेळी उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, तालुका प्रमुख बाजीराव दळवी, भीमसेन बडेकर, माधव कोळंबे, पंढरीनाथ राऊत, करणा बडेकर, निलेश घरत आदी प्रमुख उपस्थित होते. यावेळी कर्जत नगरपरिषदेवर निवडून आलेल्या सुवर्णा जोशी, संतोष पाटील, सुचिता खोत, मानसी कानिटकर आणि पुरस्कृत प्रशांत पाटील यांचा अभिनंदन ठराव घेण्यात आला.

### प्रार्थना लाड जिल्ह्यात तिसरी



**म्हसळा** : अबॅकस ही परिक्षा संपूर्ण महाराष्ट्रात घेतली जाते. त्यामुळे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या सारख्या मुलभुत क्रिया जलद आणि अचुकपणे मांडणे सोपे जाते. मुलांची एकाग्रता, स्मरणशक्ती आणि बौद्धीक क्षमता वाढविण्यासाठी अबॅकसकडून अशा प्रकारे परिक्षा घेतल्या जातात. यावेळी या परिक्षेत रायगड जिल्ह्यातील विविध शाळांमधुन चारशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही परिक्षा दि.२१ डिसेंबर रोजी डोंबीवली मधील लोढा हायस्कुलमध्ये पार पडली. या परिक्षेत माणगावातील मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे शाळेतील इयत्ता पाचवीतील विद्यार्थीनी प्रार्थना लाड हिने वैदीक गणित या परिक्षेत यश मिळवुन जिल्हात तिसरा क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशाने सर्व स्तरातुन प्रार्थनाचे कौतुक होत आहे.



### श्रीवर्धन तालुक्याचे पर्यटन खड्ड्यात

**दिघी** : श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर पर्यटन स्थळाला जाणारा दांडगुरी-बोर्लीपंचतन मुख्य रस्ता खड्ड्यात गेला आहे. वैशिष्ठ्यपूर्ण पर्यटन स्थळांशेजारी रस्त्याची तर अक्षरशः चाळण झाल्याने पर्यटक व वाहनचालक या खड्ड्यांमुळे प्रवासाला कंटाळले आहेत. त्यामुळे श्रीवर्धनचे पर्यटन खड्ड्यात गेल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे.श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर, आरावी समुद्रकिनारा, श्रीवर्धन शहर व हरिहरेश्वर अशा मुख्य पर्यटन स्थळांना जोडणारा दांडगुरी-बोर्ली-पंचतन मार्ग सद्या खिळखिळा बनला आहे. पर्यटनाला गती मिळावी यासाठी शासन स्तरावर अनेक योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुका आग्रही ठरत आहे. मात्र, येथील रस्त्यांसारख्या पायाभूत सुविधांकडे अद्याप दुर्लक्ष होत आहे. सद्यस्थितीत अपूर्ण डांबरीकरणामुळे दांडगुरी-कार्ले मार्गावरिल टोकदार खडी बाहेर आली आहे. या रस्त्याकडे कोणत्याही लोकप्रतिनिधींचे लक्ष नसल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याशिवाय पर्यटन दृष्टीकोनातून महत्वाचा मार्ग असल्याने मोठ्या प्रमाणात रस्त्यावर खड्डे पडल्याने पर्यटक संताप व्यक्त करत आहेत. या रस्त्यावरून वाहनधारकांना वाहन चालविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे पर्यटक व् नागरिकांना कित्येक वर्ष या रस्त्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांना दररोजच्या प्रवासात त्रास होत असताना, नवीन वर्षाच्या स्वागताचा आनंद खड्ड्यांमुळे हिरावून घेतला जात आहे. त्यामुळे रस्त्यांची त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनधारक व ग्रामस्थांकडून होत आहे.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **कुरुळ ता. अलिबाग** येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- **नागावमधील हॉटेलमध्ये** काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . वेटर, रिसेप्शनिस्ट, किचन मोरी, हाऊसकिपींग, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅपवर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **अलिबागमधील ऑफिस करीता** खालील जागा भरणे आहे. ऑफिस क्लार्क व ऑटोकॅड ड्राफ्ट्समन मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- **पाहिजेत -अलिबाग येथे** ऑफिसमध्ये कॉम्पुटर ऑपरेटर/ ऑफिस असिस्टंट पाहिजे. संपर्क - श्री.मधुकर पाटील ९२७३२८९०१५/९४२०३२५१०६
- **मंगल ग्रेन स्टोअर्स**, बाजारपेठ अलिबागमध्ये कामासाठी मूले व मुली पाहिजेत संपर्क - ७८७५११००१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# महिला मंडळाच्या शाळेवर टांगती तलवार

## प्राथमिक शिक्षण विभागाकडून कारवाई सुरु

**| रसायनी | प्रतिनिधी |**

मोहोपाडा रसायनी येथील महिला उद्योग मंडळ संचलित प्राथमिक शाळा ही ६० टक्के अनुदानित असूनही विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर पद्धतीने मासिक फी घेत असल्याची माहिती समोर आली होती. तसेच, ही शाळा परवानगी न घेता स्थलांतरीत करून पालक आणि शिक्षण विभागाची फसवणूक करत असल्याचे आरोप देखील करण्यात आले होते. चौकशी दरम्यान शाळेवरील आरोप सिद्ध झाले असून या शाळेवर बंदीची टांगती तलवार लटकलेली दिसून येत आहे.



महिला उद्योग मंडळाची प्राथमिक शाळा ही ६० टक्के अनुदानित शाळा आहे. तरी देखील ही शाळा विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर पद्धतीने मासिक फी घेत असल्याची माहिती समोर आली होती. या संदर्भात राजिप प्राथमिक शिक्षण विभागातर्फे चौकशीचे आदेश देण्यात आले होते. या चौकशीत ही शाळा विद्यार्थ्यांकडून फी घेत असल्याचे निष्पन्न झाले. तसेच, मुख्यध्यापकांनी देखील फी आकारत असल्याचे सांगितले. त्यामुळे शाळेवरील हे आरोप सिद्ध झाले असून याबाबत प्राथमिक शिक्षण विभागातर्फे शाळेला नोटिस देण्यात आली आहे. तसेच, ही शाळा विनापरवानगी स्थलांतर केल्याचे देखील आरोप करण्यात आले आहेत. या संदर्भात संस्थेच कार्याध्यक्ष अरुण गायकवाड व आकाश कांबळे यांनी गतवर्षी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत त्यांनी, महिला उद्योग मंडळाची शाळा विनापरवानगी स्थलांतरीत करून पालक आणि शिक्षण विभागाची फसवणूक करत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे खालापूर गटशिक्षण अधिकारी यांनी फेब्रुवारीत चौकशीचे आदेश दिले होते. या चौकशी दरम्यान, ही एचओसी कंपनीच्या जीर्ण होत असलेल्या धोकादायक अशा माणिक प्रबळ इमारतीमध्ये भरत असून ती विनापरवाना स्थलांतर केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे अशा संस्थेची मान्यता आपोआपच रद्द समजली जाते. असे गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे. सध्या आनुदान वाचविण्यासाठीची धडपड म्हणून महिला उद्योग मंडळ संचलित प्राथमिक शाळेचे पराडे येथे बांधकाम सुरु आहे. या प्रकरणी पुढील कार्यवाहीसाठी रजिप प्राथमिक शिक्षण विभागाने पत्र व्यवहार करून शाळेवर योग्य ती कारवाई करण्यासंदर्भात विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग यांना पत्र सादर केले आहे.

> “या शाळेची इमारत ही जिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार धोकादायक असून देखील आज तागायत ही संस्था हजारो विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या संस्थेची नोंदणी रद्द व्हावी, अशी शासनदरबारी मागणी करणार आहे.”
>
> – आकाश कांबळे, सामाजिक कार्यकर्ता

> “मी या संस्थेवर काम करत असताना संस्थेमध्ये होत असलेल्या गैरव्यवहाराची माहिती मिळाली. परंतु, त्यासंदर्भात संस्थेला कल्पना देऊनसुद्धा संस्थेने त्यावर कोणताही विचार न करता भ्रष्टाचार सुरू ठेवला. त्यामुळे मी धर्मादाय आयुक्त रायगड जिल्हा यांच्याकडे हे मंडळ बरखास्त व्हावे, अशी मागणी केलेली आहे. तसेच, या संस्थेबाबत केंद्र प्रमुखांनी देखील बघ्याची भूमिका घेतलेली दिसून येत आहे. त्यामुळे अशा बेजबादार केंद्र प्रमुखांसह दोषींवर सुद्धा राज्य शासन व संचालकांनी कारवाई केली पाहिजे.”
>
> –अरुण गायकवाड, कार्याध्यक्ष, महिला उद्योग मंडळ

# गरोदर मातांची आरोग्य तपासणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

मुंबई येथील युनायटेड वे ही स्वयंसेवी संस्था कर्जत तालुक्यात कुपोषण निर्मूलन आणि आरोग्य क्षेत्रात कार्य करीत आहे. आदिवासी आणि ग्रामीण भागातील गरोदर माता पोषण आहारापासून मदत करणाऱ्या या संस्थेकडून गरोदर मातांची महिलांची तपासणी केली जाते. त्यांच्या या कार्याला मदत करण्यासाठी रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर मदत करीत असून पहिल्या टप्प्यात ६० गरोदर मातांची आणि त्यांच्या पोटातील बाळाची अत्याधुनिक मशीन द्वारे तपासणी करण्यात आली.



रायगड हॉस्पिटल आणि युनायटेड वे यांच्या प्रोजेक्ट पोषण यांच्याकडून गर्भवती स्त्रियांचे तपासणी करण्यात आली. पहिल्या टप्प्यात ६० गरोदर मातांची तपासणी उपक्रमाचा शुभारंभ रायगड हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुशाग्र पटेल यांचे हस्ते करण्यात आला. या तपासणीसाठी कर्जत तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रातील गरोदर माता सहभागी झाल्या होत्या. सर्वप्रथम त्यांची फुलांनी सजवलेल्या झोपाळ्यावर बसवून ओटी भरण्यात आली. त्यानंतर या महिलांना युनायटेड वेकडून औषधांचे खास किट देण्यात आले. यावेळी महिलांच्या तपासणी अत्याधुनिक मशीनच्याद्वारे करण्यात आली. त्या मशीनच्या आधारे माता आणि त्यांच्या बाळाची माहिती मिळत होती. त्या मशीनमधून विविध ५४ आजार यांच्याविषयी माहिती मिळाली. यासाठी युनायटेड वेकडून रेखा जाधव, खंडू मंजिले, राजेश क्षीरसागर, अर्चना पाटील, पिंकी कवठे, वेदांती बडेकर, दीपक गुपाता, सचिन चतुरे, प्रवीण खंडवी यांच्याकडून हा उपक्रम कर्जत तालुक्यात राबविला जात आहे.

# शिक्षण प्रसारक मंडळाची सभा

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक व सहाय्यक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी (दि.२३) संस्थेच्या रविंद्र ना. राऊत माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिल भुसाणे हे होते. सभेच्या सुरूवातील मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे, २०२४-२५ च्या दुरुस्त अंदाजपत्रकास मंजुरीदेणे, सभासदांकडून विचारण्यात आलेल्या लेखी प्रश्नांची उत्तरे देणे, २०२४-२५ चा अहवाल सादर करणे व जमाखर्च संमत करणे, २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे इत्यादी कामांचा आढावा घेण्यात आला. दरम्यान, सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.



# निवासी शिबिराचा समारोप संपन्न

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील नागोठणा येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने वेलशेत आंबेघर येथे दि.१८ ते २४ डिसेंबर दरम्यान श्रम संस्कार निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप समारंभ बुधवारी(दि.२४) सायंकाळी जिल्हा समन्वयक प्रा. मोकल यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. या शिबिराचे उद्घाटन पिगोंडे ग्रामपंचायतीच्या माजी उपसरपंच कांचन माळी यांच्या हस्ते आणि रोहा येथील डॉ. सी.डी. देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. विकसित भारताच्या प्रगतीसाठी युवकांचे योगदान, मेक इन इंडिया, माय इंडिया या थीमवर आधारित या शिबिरात श्रमदान मोहीमेंतर्गत गावातील रस्ते, मंदिर परिसर व स्मशानभूमी परिसरातील साफसफाईची कामे इत्यादी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.



# अतुल मालकरकडून अधिकाऱ्यांना त्रास

## ● ग्रामपंचायतीकडून लेखी तक्रार

**| रसायनी | प्रतिनिधी |**

रसायनी पाताळगंगा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अतुल मालकर हे सुशिक्षित बेरोजगार अभियंता असून त्यांच्याकडून ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे यांना मानसिक त्रास होत असल्याची तक्रार ग्राम विकास अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. तसे, निवेदन गट विकास अधिकारी संदीप कराड यांना देण्यात आले आहे.

अतुल मालकर हे खालापूर तालुक्यातील तळवली येथील रहिवाशी आहेत. ते जिल्हा परिषदेचे नोंदणीकृत कंत्राटदार असून ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ग्रामपंचायत अधिकारी सुहास वारे यांच्याविषयी बिनबुडाचे, कोणतेही पुरावे नसताना वारंवार ऑनलाईन तक्रारी करत आहेत. आजपर्यंत त्यांनी २५४ तक्रार अर्ज केलेले आहेत. त्यांना ग्रामपंचायत विकास कामांचा ठेका मिळावा, तसेच ग्रामपंचायत वडगांव हद्दीतील होणाऱ्या २ कोटी रुपयांच्या विकास कामांची मागणी करत आहेत. ते दडपशाहीचा वापर करून ही कामे न दिल्यास या पुढे देखील तक्रार करत राहणार, अशा स्वरुपाचा इशारा दिली आहे. मागील ग्रामपंचायत लोक प्रतिनिधींवरील राग ते व्यक्त करीत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सुहास वारे हे प्रचंड मानसिक दबावाखाली असल्यामुळे त्यांना रक्त दाबाचा त्रास सुरु झाला आहे. परिणामी काही अनुचित घटना घडू शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# तिसे येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण

**कोलाड** : रोहा तालुक्यातील तिसे येथे सामुदायिक ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरीनाम जप यज्ञ सप्ताह दि.२६ ते २९ डिसेंबर या कालावधीत संपन्न होणार आहे. या सप्ताहात धार्मिक तथा आध्यात्मिक कार्यक्रम तसेच महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची किर्तन सेवा आणि प्रवचन मार्गदर्शन सेवा लाभणार आहे. सर्व सांप्रदायिक भाविकांनी या भक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थ मंडळी तिसे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# युवा महोत्सवात बहरले कवी संमेलन

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

द्रोणागिरी युवा महोत्सवात राज्यस्तरीय भव्य कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान द्रोणागिरी असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत यांनी भूषविले होते. कवी संमेलनाचे उद्घाटन महिला संघटक वैशाली घरत यांच्या हस्ते झाले. तर, व्यासपीठावर जेएनपीएचे विश्वस्त भूषण पाटील, डॉ. उदय नामदेव घरत हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कवी अरुण म्हात्रे यांनी ‘खरा तो एकची धर्म’ ही साने गुरुजींची विश्वप्रार्थना आपल्या सुरेल आवाजातून सादर केली. यावेळी सर्व उपस्थित मान्यवर आणि सारस्वत यांनी उभे राहून या प्रार्थनेला दोन्ही कर जोडून उत्तम साथ दिली. शेवटी अध्यक्षीय भाषणात महादेव घरत यांनी द्रोणागिरी युवा महोत्सवाच्या वाटचालीबद्दल मोजक्या व योग्य शब्दात माहिती देऊन संमेलनाच्या नियोजनाचे भरभरून कौतुक केले. दरम्यान कवी संमेलनात राज्यातील सुमारे ४५ कवींनी बळीराजा, पर्यावरण संतुलन व भूमिपुत्र या दिलेल्या विषयांवर आधारित कविता सादर करून, संमेलनाची रंगत वाढवली.



# ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ अभियान

**| माणगाव | प्रतिनिधी |**

औद्योगिक क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून ग्रामीण भागातील मुलींच्या उज्जवल भविष्यासाठी एक आश्वासक पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारच्या ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’ या योजनेला बळ देत कंपनीने भागाड ग्रामपंचायत हद्दीतील प्रत्येक पात्र बालिकेच्या नावे ५० हजार रुपयांची मुदत ठेव करण्याचा उपक्रम यशस्वीपणे राबवला आहे. सन २०१७ पासून सुरु असलेल्या या उपक्रमाद्वारे आत्तापर्यंत १०० मुलींना या योजनेचा लाभ मिळाला आहे.




या योजनेचे मुख्य वैशिट्य म्हणजे, ही ५० हजार रुपयांची ठेव मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत सुरक्षित राहते व १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व्याजासह मिळणारी ती रक्कम मुलीला तिचे उच्च शिक्षण किंवा व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी उपयोगात येते. आर्थिक टंचाईळे ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण अपूर्ण राहू नये, हा या मागचा मुख्य उद्देश आहे. दि.१६ डिसेंबर रोजी भागाड ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या या कार्यक्रमात २०२४ मध्ये जन्मलेल्या ५ मुलींना मान्यवरांच्या हस्ते मुदत ठेव प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला पोस्कोचे वरिष्ठ अधिकारी, माणगावचे गटविकास अधिकारी, भागाड ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, उपरपंच, सदस्य, पदाधिकारी, मुलींचे पालक आदी उपस्थित होते.

**प्रत्येक थेंबाची वसुली होणार** | **सर्व वापरांसाठी पाणी मीटर बंधनकारक**

# पाणीपुरवठा योजनेच्या कामाला वेग

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहराच्या दीर्घकालीन पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजनेचे काम पावसाळ्यानंतर पुन्हा वेगाने सुरू झाले आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा आणि भविष्यातील गरजांचा विचार करून उभारण्यात येणारी ही योजना पूर्णत्वाकडे वाटचाल करत असून नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार आहे.



या योजनेअंतर्गत एकूण ८ पाण्याच्या टाक्यांपैकी ५ टाक्यांचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित ३ टाक्यांची कामे अंतिम टप्प्यात वेगाने सुरू आहेत. खांदाड येथील जलशुद्धीकरण केंद्र, पाणी उपसा केंद्र ही महत्त्वाची कामे प्रगतीपथावर असून मुख्य पाणीपुरवठा टाकीचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती नगरपंचायत कार्यालयाकडून देण्यात आली आहे. सुमारे ५४ कोटी रुपये खर्चाची ही भव्य पाणीपुरवठा योजना माणगाव शहरासाठी एक मोठे वरदान ठरणार आहे. खांदाड येथे ७ लाख लिटर क्षमतेची मुख्य पाणीपुरवठा टाकी उभारण्यात येणार असून खांदाड, बामणोली रोड, नाणोरे, रेल्वे स्थानक परिसर, गणेशनगर, उतेखोल आणि जुने माणगाव या भागांमध्ये २ ते ३ लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित तीन टाक्यांची कामे सध्या वेगाने सुरू असून ती लवकरच पूर्ण होणार आहे.

या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पाणी मीटर प्रणाली ही आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक घर, आस्थापना व व्यावसायिक वापरासाठी पाणी मीटर बसवण्यात येणार असून वीज मीटरप्रमाणे दरमहा पाणी वापराचे बिल देणे बंधनकारक असणार आहे. त्यामुळे प्रत्येक थेंबाची मोजणी होऊन त्यानुसारच वसुली केली जाणार आहे.

### मीटरमुळे पाण्याचा अपव्यय थांबेल

**पाणी मीटरमुळे पाण्याचा अपव्यय थांबणार असून मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होईल आणि जाणीवपूर्वक वापराकडे नागरिकांचा कल वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. मात्र, जादा पाणी वापरणाऱ्या आणि पाणी वाया घालवणाऱ्यांवर आर्थिक पायबंद बसणार असल्याने नागरिकांनी जबाबदारीने पाण्याचा वापर करावा, असे आवाहनही नगरपंचायत प्रशासनाकडून करण्यात आले आहे. एकूणच माणगाव शहराच्या विकासात महत्त्वाची भर घालणारी ही पाणीपुरवठा योजना भविष्यातील पिढ्यांसाठी शाश्वत आणि सुरक्षित पाणीव्यवस्था निर्माण करेल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.**

# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न



। कोलाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरुन मुंबई, ठाणे, तसेच पुणे येथून २५ डिसेंबर रोजी नाताळची सुट्टी असल्यामुळे असंख्य पर्यटक सुट्टीचा आनंद घेण्यासाठी कोकणात निघाले आहेत. परंतु खांब, कोलाड, इंदापूर, माणगांव, येथील चौपदरी करणाच्या अपूर्ण कामामुळे येथे प्रवाशी वर्गाला वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. यामुळे हा वाहतूक कोंडीचा तिढा केव्हा सुटणार असा सवाल प्रवाशी वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रायगड पोलिसांकडून शर्थिचे प्रयत्न सुरु आहेत.

नाताळची सुट्टी तसेच आल्हादायक थंडी असल्यामुळे याचा आनंद घेण्यासाठी असंख्य पर्यटक मुंबई-गोवा हायवे वरुन एसटीबस, फोर व्हिलर, रिक्षा, टू व्हीलर, तसेच इतर वाहनांनी कोकणात निघाले आहेत.

परंतु मुंबई-गोवा हायवे वरील खांब, कोलाड, इंदापूर, माणगाव,येथील अपूर्ण कामामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असुन वाहतूक कोंडी निर्माण झाली.

मुंबई-गोवा हायवे वरील कोलाड येथे उड्डाण पुलाचे काम सुरु आहे. तसेच पुलाच्या बाजूला सर्व्हिस रोडचे ही काम सुरु आहे. या खांब येथील ब्रिजचे काम सुरु आहे. असल्यामुळे येथे अपूर्ण रस्त्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.परंतु कोलाड सपोनि नितीन मोहिते तसेच पोलिस कर्मचारी, वाहतूक पोलिस, जागोजागी उभे राहून वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत आहेत.

# हवामान बदलाचा रब्बी पिकांवर परिणाम

। कोलाड । प्रतिनिधी ।

सध्या हवामानात अनेक दिवसांपासून बदल झालेला जाणवत आहे. पहाटे धुक्याची चादर, त्यातून सूर्याचे डोकावणे, नंतर कोवळे ऊन, तर क्षणात आकाशात दाटून आलेले ढग असे विचित्र वातावरणमुळे सर्वजण अनुभवत आहेत. यामुळे यंदा खरिपाच्या शेतीचे नुकसान झाले आहे. वातावरणातील बदलामुळे शेतीवर परिणाम झाल्याचे चित्र आहे. मात्र मागील सहा महिन्यांपासून सतत ओलावा टिकून राहिल्याने फळझाडांना विशेषतः आंबे, शेवगा यांना आता मोहोर व फुलोरा येण्याची वेळ असताना चक्क नवी पालवी फुटू लागली आहे. तर लांबलेल्या पावसामुळे रब्बी हंगाम सुद्धा लांबला आहे.



दरसाल होणाऱ्या भाजीच्या वाडीलाही अद्याप असलेला ओलावा परिणामकारक ठरला आहे. यंदा अजून कांदा, मिरची, मुळा, टोमॅटो, चवळी, वांगी, भेंडी, गवार ही पिके लांबणीवर पडली आहेत. याचबरोबर वसईचा अत्यंत चवीचा हिरव्या भाजीतील पावटा, लाल वाल कमी अधिक प्रमाणात बाजारात यायचा त्याची रोपे आता बांधावर उगवू लागली आहेत. हरभरा, वाल, तूर, तीळ, उडीद, मूग हि पिके सुद्धा लांबणीवर पडली आहेत. त्यामुळे पुढील रब्बी हंगाम लागवड वेळेवर करता येईल का याची चिंता शेतकऱ्यांना लागली आहे.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कार्यालय**
कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड— ता. कर्जत,जि.रायगड
Email ID :

**सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,कर्जत,जि.रायगड यांचे समोर**
**अर्ज क्रमांक :— ९३/२०२५/२०२६**

**मे. मॅनेजर**
अलिबाग को—ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग
शाखा — कर्जत, जि.रायगड. } अर्जदार

**विरुध्द**

**प्रति,**
१) **श्री. दिपक गोटीराम धुळे**
मु. आरवंद, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
२) श्री. विलास वासुदेव थोरवे
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
३) श्रीमती सुप्रिया विलास थोरवे
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड } जाब देणार

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम २५,१२,३३२/— साठीचा अर्ज.

ज्या अर्थी अलिबाग को—ऑप. अर्बन बँक लि., शाखा—कर्जत तफे म. वसुली अधिकारी यांनी दिनांक ०६/११/२०२५ रोजी तुमचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रिसर अर्ज या प्राधिकरणासमोर दाखल केलेला आहे, आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्या अर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुध्द रक्कम रू. २५,१२,३३२/— ( अक्षरी रूपये पंचवीस लाख बारा हजार तीनशे बत्तीस मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

त्याअर्थी तुम्हास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादी दिनांक १९/१२/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पध्दतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. सबब आपण सुनावणी वेळी उपस्थित राहिला नाहीत.

त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देण्योची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देण्यात येते की, दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड—ता. कर्जत,जि.रायगड या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१२/२०२५

**सही/–**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत–रायगड .**

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कार्यालय**
कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड— ता. कर्जत,जि.रायगड
Email ID :

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. रायगड यांचे समोर**
**अर्ज क्रमांक :—९५/२०२५/२०२६**

**मे. मॅनेजर**
अलिबाग को—ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग
शाखा — कर्जत, जि.रायगड. } अर्जदार

**विरुध्द**

**प्रति,**
१) **श्री. विलास वासुदेव थोरवे**
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
२) श्री. वैभव विलास थोरवे
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
३) श्री. जगदीश शंकर ठाकरे
मु. पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड } जाब देणार

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम १२,५९,२४३/— साठीचा अर्ज.

ज्या अर्थी अलिबाग को—ऑप. अर्बन बँक लि., शाखा—कर्जत तफे म. वसुली अधिकारी यांनी दिनांक ०६/११/२०२५ रोजी तुमचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रिसर अर्ज या प्राधिकरणासमोर दाखल केलेला आहे, आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्या अर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुध्द रक्कम रू. १२,५९,२४३/— ( अक्षरी रूपये बारा लाख एकोणसाठ दोनशे त्रेचाळीस मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

त्याअर्थी तुम्हास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादी दिनांक १९/१२/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पध्दतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. सबब आपण सुनावणी वेळी उपस्थित राहिलात नाही.

त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देण्योची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देण्यात येते की, दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड—ता. कर्जत,जि.रायगड या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१२/२०२५

**सही/–**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत–रायगड .**

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कार्यालय**
कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड— ता. कर्जत,जि.रायगड
Email ID :

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. रायगड यांचे समोर**
**अर्ज क्रमांक :— ९७/२०२५/२०२६**

**मे. मॅनेजर**
अलिबाग को—ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग
शाखा — कर्जत, जि.रायगड. } अर्जदार

**विरुध्द**
**प्रति,**
१) **श्री. अभिजित वसंत रूठे**
मु. आरवंद, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
२) श्री. विलास वासुदेव थोरवे
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
३) श्री. रूपेश सदानंद थोरवे
मु. उत्कुल पो. चिंचवली, ता. कर्जत, जि. रायगड
४) श्री. रमाकांत नथू जाधव
मु. पो. कोंदवडे, ता. कर्जत, जि. रायगड }

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम १३,४३,८८५/— साठीचा अर्ज.

ज्या अर्थी अलिबाग को—ऑप. अर्बन बँक लि., शाखा—कर्जत तफे म. वसुली अधिकारी यांनी दिनांक ०६/११/२०२५ रोजी तुमचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रिसर अर्ज या प्राधिकरणासमोर दाखल केलेला आहे, आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्या अर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुध्द रक्कम रू. १३,४३,८८५/— ( अक्षरी रूपये तेरा लाख त्रेचाळीस हजार आठशे पंच्याऐंशी मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

त्याअर्थी तुम्हास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादी दिनांक १९/१२/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पध्दतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. सबब आपण सुनावणी वेळी उपस्थित राहिला नाहीत.

त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देण्योची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देण्यात येते की, दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड—ता. कर्जत,जि.रायगड या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१२/२०२५

**सही/–**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत–रायगड .**

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कार्यालय**
कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड— ता. कर्जत,जि.रायगड
Email ID :

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. रायगड यांचे समोर**
**अर्ज क्रमांक :— ९४/२०२५/२०२६**

**मे. मॅनेजर**
अलिबाग को—ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग
शाखा — कर्जत, जि.रायगड. } अर्जदार

**विरुध्द**

**प्रति,**
१) **सौ. सुप्रिया विलास थोरवे**
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
२) श्री. वैभव विलास थोरवे
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
३) श्री. जगदीश शंकर ठाकरे
मु. पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
४) श्री. विलास वासुदेव थोरवे
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड } जाब देणार

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम १०,०५,५०६/— साठीचा अर्ज.

ज्या अर्थी अलिबाग को—ऑप. अर्बन बँक लि., शाखा—कर्जत तफे म. वसुली अधिकारी यांनी दिनांक ०६/११/२०२५ रोजी तुमचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रिसर अर्ज या प्राधिकरणासमोर दाखल केलेला आहे, आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्या अर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुध्द रक्कम रू. १०,०५,५०६/— ( अक्षरी रूपये दहा लाख पाच हजार पाचशे सहा मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

त्याअर्थी तुम्हास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादी दिनांक १९/१२/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पध्दतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. सबब आपण सुनावणी वेळी उपस्थित राहिला नाहीत.

त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देण्योची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देण्यात येते की, दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड—ता. कर्जत,जि.रायगड या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१२/२०२५

**सही/–**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत–रायगड .**

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कार्यालय**
कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड— ता. कर्जत,जि.रायगड
Email ID :

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. रायगड यांचे समोर**
**अर्ज क्रमांक :— ९६/२०२५/२०२६**

**मे. मॅनेजर**
अलिबाग को—ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग
शाखा — कर्जत, जि.रायगड. } अर्जदार

**विरुध्द**

**प्रति,**
१) **श्री. वैभव विलास थोरवे**
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
२) श्री. जगदीश शंकर ठाकरे
मु. पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड } जाब देणार

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम १९,८५,६४९/— साठीचा अर्ज.

ज्या अर्थी अलिबाग को—ऑप. अर्बन बँक लि., शाखा—कर्जत तफे म. वसुली अधिकारी यांनी दिनांक ०६/११/२०२५ रोजी तुमचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रिसर अर्ज या प्राधिकरणासमोर दाखल केलेला आहे, आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्या अर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुध्द रक्कम रू. १९,८५,६४९/— ( अक्षरी रूपये एकोणीस लाख पंच्याऐंशी हजार सहाशे एकोणपन्नास मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

त्याअर्थी तुम्हास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादी दिनांक १९/१२/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पध्दतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. सबब आपण सुनावणी वेळी उपस्थित राहिलात नाही.

त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देण्योची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देण्यात येते की, दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड—ता. कर्जत,जि.रायगड या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१२/२०२५

**सही/–**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत–रायगड .**

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**
**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कार्यालय**
कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड— ता. कर्जत,जि.रायगड
Email ID :

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत, जि. रायगड यांचे समोर**
**अर्ज क्रमांक :— ९८/२०२५/२०२६**

**मे. मॅनेजर**
अलिबाग को—ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग
शाखा — कर्जत, जि.रायगड. } अर्जदार

**विरुध्द**

**प्रति,**
१) **श्री. अक्षय अविनाश थोरवे**
मु. आरवंद, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड
२) श्री. रमाकांत नथू जाधव
मु. पो. कोंदवडे, ता. कर्जत, जि. रायगड
३) श्री. विलास वासुदेव थोरवे
मु. पोसरी, पो. तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड }

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम १३,४३,७९२/— साठीचा अर्ज.

ज्या अर्थी अलिबाग को—ऑप. अर्बन बँक लि., शाखा—कर्जत तफे म. वसुली अधिकारी यांनी दिनांक ०६/११/२०२५ रोजी तुमचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ प्रमाणे वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रिसर अर्ज या प्राधिकरणासमोर दाखल केलेला आहे, आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरून अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे. आणि ज्या अर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुध्द रक्कम रू.. १३,४३,७९२/— ( अक्षरी रूपये तेरा लाख त्रेचाळीस हजार सातशे ब्यान्नव मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणून विनंती केली आहे.

त्याअर्थी तुम्हास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब नुसार सर्व प्रतिवादी दिनांक १९/१२/२०२५ रोजी नोंदणीकृत डाक देय पोहोच पध्दतीने नोटीस निर्गमित करणेत आली होती. सबब आपण सुनावणी वेळी उपस्थित राहिला नाहीत.

त्यामुळे अर्जदाराने जाहीर नोटीस देण्योची विनंती केली. त्यानुसार प्रतिवादी यांना जाहीर नोटीस देण्यात येते की, दिनांक ०९/०१/२०२६ रोजी दिवसाचे दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती,सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड—ता. कर्जत,जि.रायगड या कार्यालयात तुम्ही स्वत: हजर रहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासून १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहिलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करून, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक २६/१२/२०२५

**सही/—**
**सहकारी संस्था, कर्जत—रायगड.**





● नाताळची सुट्टी असल्याने अलिबाग समुद्रकिनारी पर्यटकांनी गर्दी केली होती. समुद्रकिनारी जलक्रीडा, उंट सफारीचा आनंद लुटताना पर्यटक दिसत आहेत. (छायाचित्र : समीर मालोदे)

# पर्यटन स्थळे गजबजली

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्ह्यात पर्यटकांचा ओघ नाताळच्या सुट्टीनिमित्त येत आहे. जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन समुद्र किनारे, माथेरान हे थंड हवेचे ठिकाण, पाली, महड येथील अष्टविनायक क्षेत्रांसह ऐतिहासिक स्थळांवर पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. त्यामुळे जिल्हयातील पर्यटन स्थळे गजबजून गेली आहेत. त्यामुळे प्रमुख मार्गावर वाहनांची वर्दळ प्रचंड वाढली आहे.

अलिबाग तालुक्यातील अलिबाग, वरसोली, किहीम, मांडवा, आक्षी-नागाव, मुरुड, काशिद, श्रीवर्धनमधील समुद्र किनारे येथे पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे. यामुळे किनाऱ्यांवर साहसी खेळांसह विविध प्रकारच्या व्यवसायांना पुन्हा तेजी मिळाली आहे.

याचबरोबर थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान येथेही पर्यटकांचे आगमन होऊ लागले आहे. जिल्ह्यातील महड आणि पाली या अष्टविनायकाच्या क्षेत्रासह इतर धार्मिक स्थळांवर पर्यटक भेटी देऊ लागले आहे. याशिवाय किल्ले रायगड, मुरुडमधील जंजिरा किल्ल्यासह इतर ऐतिहासिक वास्तु पाहण्यासाठी पर्यटक आलेले पहायला मिळत आहे.

दरम्यान, आलेल्या पर्यटकांना परतीच्या प्रवास नेहमीच अडथळ्याचा असतो. घरी परतणाऱ्या पर्यटकांची बस स्थानक, जलवाहतूक सेवा, खासगी वाहन स्थळांवर गर्दी झालेली पहायला मिळत आहे.

## निवडक



### पिंगळसईचे जंगल वणव्याने होरपळले

**खांब** : रोहा तालुक्यातील पिंगळसई येथे मागील दोन तीन दिवसांपूर्वी जंगल भागात लागलेल्या वणव्याने पिंगळसईचे जंगल अक्षरक्ष: होरपळून निघून जंगल संपत्तीची प्रचंड हानी झाली आहे. रोहा सामाजिक वनीकरण विभागामार्फत शून्य वणवा ही संकल्पना राबविली जात असतानाच वणवा लावून जंगल संपत्तीची हानी करणारे एकार्थी वन विभागाला आव्हानच देत आहेत. दरवर्षी तालुक्यातील जंगल भागात लावल्या जाणाऱ्या वणव्यांमुळे जंगलसंपत्तीची विपरित होत असून पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून याबाबत स्पष्टपणे नाराजी व्यक्त केली जात आहे.विविध कारणांसाठी लावल्या जात असलेल्या वणव्यांमुळे जंगलसंपत्तीची तर हानी होत आहे. याशिवाय जंगलभागात वास्तव्यास असणाऱ्या अन्य सजीव प्राणी यांचाही निवारा नष्ट होऊ लागला आहे. पिंगळसई येथे लावण्यात आलेल्या वणव्याने जंगल संपत्तीची प्रचंड प्रमाणात हानी झाली असल्याने याबाबत पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून प्रचंड चिड व्यक्त केली जात आहे.

### आप्पा गवळे यांचे निधन

**पाली** : पालीतील निवृत्त सहाय्यक फौजदार आणि पत्रकार अमित गवळे यांचे वडील आप्पा त्र्यंबक गवळे (वय ८१)



यांचे रविवारी (दि.२१) दिर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या मृत्यू नंतरही सामाजिक प्रबोधन करण्यात आले आहे. त्यांचे कुटुंबीयांच्या इच्छेनुसार दशक्रिया -उत्तरकार्य असे कोणतेच विधी करणार नाहीत. त्यामुळे तिसऱ्या दिवशी मंगळवारी (दि.२३) पुण्यानुमोदन कार्यक्रम करण्यात आला. यावेळी आलेले आप्तेष्ट, नातेवाईक व मित्र परिवार यांना महा. अंनिसच्या व डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रबोधनात्मक पुस्तकांचे वाटप करण्यात आले. गवळे यांच्या अस्थी विसर्जित न करता त्यांच्या घराच्या परसबागेत दोन खड्डे करून त्यामध्ये अस्थी ठेवून त्यावर झाडे लावण्यात आली असून अशाप्रकारे त्यांच्या आठवणी जोपसण्यात आल्या. गवळे यांनी रायगड जिल्ह्यात ३९ वर्ष पोलीस दलामध्ये प्रामाणिकपणे सेवा केली. आपल्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी अनेक प्रकरणे यशस्वीपणे हाताळली असून याबद्दल त्यांना अनेक रिवॉर्ड मिळाले आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सहा मुली, सून, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे.




### विज्ञान प्रदर्शनात श्रावणीला यश

**खरोशी** : पेण एज्युकेशन सोसायटीचे प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनियर कॉलेज पेण येथील ११ वी विज्ञान शाखेची विद्यार्थिनी श्रावणी शिंदे हिने ५३ व्या रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनात वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक व निबंध स्पर्धेतही द्वितीय क्रमांक पटकावला. तिने स्वतःबरोबर शाळेचे नाव उंचावले आणि संस्थेचे नावे मोठे केले. श्रावणी लहानपणापासूनच हुशार आणि गुणसंपन्न असल्यामुळे इयत्ता पहिलीपासून दहावीपर्यंत सर्व विविध स्पर्धांमध्ये ती पुढेच असायची आणि आताही तीने जिल्हा विज्ञान प्रदर्शनामध्ये आपल्या अमोघ वाणीने वकृत्व स्पर्धेत आणि निबंध स्पर्धेमध्ये जिल्ह्यात क्रमांक पटकावला. या स्पर्धेसाठी तिला प्रा.अस्मिता म्हात्रे ह्यांनी मार्गदर्शन केले. श्रावणीला मिळालेल्या यशाबदल प्राचार्य आर एम पाटील, उपप्राचार्य भांडवलकर व सर्व ज्युनियर कॉलेजच्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# महाडिकवाडीत उतरवले अंधश्रद्धेचे भूत

- पोलीस-अंनिसने केला सत्याचा उलगडा
- जादूटोण्याच्या भीतीवर विज्ञानाचा विजय

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

अंधश्रद्धा हा आपल्या समाजातील एक फार जुना आणि गंभीर प्रश्न आहे. विज्ञान आणि शिक्षणाच्या युगातदेखील अनेक लोक अजूनही अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेले आहेत. अज्ञान, भीती आणि चुकीच्या समजुती यामुळे अंधश्रद्धा पिढ्यानपिढ्या पुढे चालत आलेल्या आहेत. यामध्ये काही बाबतीत धार्मिक आडमार्ग, भोंदू बाबा, चमत्कारी उपचार, अंधश्रद्धेमुळे माणूस आपल्या बुद्धीचा वापर न करता केवळ भावनांवर विश्वास ठेवतो. त्याच पार्श्वभूमीवर पेण शहराजवळील महाडिकवाडी गावात काही दिवसांपासून भूत, करणी, जादूटोणा होत असल्याची अफवा पसरवून गावात भीतीचे वातावरण निर्माण केले जात होते. यासंदर्भात पोलीस व महा. अंनिसने गावातील लोकांचे प्रबोधन व जनजागृती करून भीती घालवली.



गावात जिवंत कोंबडा जमिनीत पुरणे, स्मशानभूमीत नारळ फोडणे, घरात मोठ्या आवाजात मंत्र-तंत्र करून दहशत पसरवणे अशा घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीती निर्माण झाली होती. याबाबत ग्रामस्थांनी पेण पोलीस स्टेशन तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (म.अंनिस), पेण यांच्याकडे तक्रार केली होती.

महा. अंनिसने या प्रकरणाची ग्रामस्थांबरोबर शहानिशा करून उपविभागीय पोलीस अधिकारी नालकुल यांच्याशीही सविस्तर चर्चा केली व ज्यांच्यावर आरोप होते त्या कुटुंबाची भेट घेतली.

सर्व बाबींचा विचार करून गावात भूत, भानामती, करणी, जादूटोणा याबाबत चमत्कारा मागील विज्ञान या विषयी प्रात्यक्षिके व प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार बुधवारी सायंकाळी महाडिकवाडी येथे त्यानुसार व्याख्यान घेण्यात आले. या व्याख्यानाचा सकारात्मक परिणाम दिसून आला असून, अशा प्रकारे करणी-जादूटोणा होत नसल्याची वैज्ञानिक व तर्कशुद्ध माहिती मिळाल्याने ग्रामस्थांच्या मनातील भीती पूर्णपणे दूर झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पोलीस सब इन्स्पेक्टर रसाळ, महा. अंनिसकडून नितीन निकम, प्राचार्य सतीश पोरे, जगदीश डंगर व संदेश गायकवाड उपस्थित होते.

> मंत्र तंत्र करून, कोंबडं पुरून वा नारळ फोडून कोणावरही जादूटोणा वा करणी करता येत नाही. याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. अशा पद्धतीने कोणी दहशत पसरवीत असल्यास महा. अंनिस सोबत संपर्क साधावा. त्या मांत्रिक, बाबा, भगत वा महाराजाचा योग्य तो कायदेशीर पद्धतीने बंदोबस्त केला जाईल.
>
> -संदेश गायकवाड, कार्याध्यक्ष, महा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रायगड

## उसरोलीत प्लॅस्टिक पिशवी बंदी

। कोर्लई । प्रतिनिधी ।

शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत मुरुड तालुका पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान विभाग, उसरोली ग्रामपंचायत, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि आम्ही संस्थेतर्फे खारिकवाडा येथे भरणाऱ्या आठवडा बाजारात पर्यावरण संतुल राखण्यासाठी प्लॅस्टिक पिशवीचा वापर टाळण्यासाठी अभियान राबविण्यात आले. श्रेया गद्रे, आम्ही संस्थेचे महेंद्र यांनी प्लॅस्टिक पिशवीच्या वापरामुळे होणारे तोटे याबाबत माहिती दिली. आठवडा बाजारात प्लास्टिक पिशवी वापरास बंदी करण्यात आली. याप्रसंगी ग्रामपंचायत प्रशासक प्रसाद माळी, वसंत दळवी, श्रेया गद्रे स्वच्छ समन्वयक, मांदाडकर कृषी बाजार, समिती, ग्रामपंचायत अधिकारी खैरनार, पोलिस कर्मचारी, उसरोली-मजगाव ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## कोर्लईत नाताळ सण साजरा



। कोर्लई । प्रतिनिधी ।

ऐतिहासिक व तीनशे वर्षांहून अधिक पारंपारिक वारसा लाभलेल्या कोर्लईच्या माऊंट कार्मेल चर्चमध्ये प्रभू येशूचा जन्म दिवस नाताळ सण हर्षो उल्हासात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आठ दिवस मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कोर्लईतील माऊंट कार्मेल चर्चला तब्बल तीनशेहून अधिक वर्षांचा इतिहास व वारसा लाभलेला आहे.या चर्चची स्थापना सन. १७१३ मध्ये झाली,आजही त्याच जोमाने, उत्साहाने येथील ख्रिस्ती बांधव नाताळ सण साजरा करतात. यानिमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. मुंबई, पुणे, वसई अन्य ठिकाणी कामानिमित्त बाहेर असलेले बांधव एकत्रितपणे येतात. त्यामुळे गावात आनंदोत्सवाचे वातावरण असते. (दि.२३) डिसेंबर रोजी माऊंट कार्मेल हायस्कूलमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रभू येशूचा जन्माचे नाटीका विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. त्यानंतर मुलांना चॉकलेट दिले. दि.२४ डिसेंबरच्या रात्री प्रभू येशूचा जन्म सोहळा चर्चमध्ये मिस्सा बलिदान अर्पण करून आनंदाने साजरा करण्यात आला. यावेळी माऊंट कार्मेल चर्चचे फादर बोनाव्हेंचर नुनीस यांनी सर्वांना नाताळच्या शुभेच्छा दिल्या.

## माझी शाळा माझा अभिमान उपक्रम

। हमरापूर । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील गागोदे बुद्रुक येथील प्राथमिक शाळेत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत माझी शाळा माझा अभिमान उपक्रमात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला. सुरुवातीला माजी विद्यार्थ्यांचे शाळेतील मुलांनी लेझीम खेळून व स्वहस्ते केलेल्या वेलकम ग्रीटिंगने स्वागत करण्यात आले. वैशाली येलवे यांनी सदर कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. स्मिता पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. याप्रसंगी संदीप पाटील, ॲड. नितीन जेधे, पल्लवी जगताप व अन्य माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमास सोनाली जगताप, सर्व माता-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सागरी सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर वाहन तपासणी

### मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई

। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।

पोलीस विभागाकडून सागरी सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन तालुक्यातील प्रमुख रस्ते, चौक व संवेदनशील ठिकाणी वाहनांची सखोल तपासणी व नाकाबंदी करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवली फाटा येथे वाहन तपासणी करण्यात येत असून, दिघी बंदर व दिवेआगार शेखाडी श्रीवर्धन या समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांचीसुद्धा सुरक्षेच्या दृष्टिकोनातून तपासणी करण्यात येत आहे.



या सुरक्षा मोहिमेनुसार संशयास्पद वाहने, कागदपत्रे व चालकांची कसून चौकशी करण्यात आली. त्याचबरोबर महिनाभरात मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या ३५ वाहनचालकांवर कायद्यानुसार गुन्हे दाखल करत साडेतीन लाख रुपये दंडाची वसुली करण्यात आली.

मागील काही महिन्यांमध्ये तालुक्यामध्ये येणाऱ्या पर्यटकांकडून मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवल्यामुळे अपघातात काही नागरिकांना प्राण गमवावे लागले होते, तर काही जणांना कायमचं अपंगत्व आले आहे. त्यामुळे ही मोहीम अपघात रोखण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच नागरिकांच्या जीवित सुरक्षिततेसाठी राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. या कारवाईमुळे मद्यधुंद वाहनचालकांमध्ये खळबळ उडाली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे यांनी स्पष्ट केले.

### छताच्या स्लॅबचे तुकडे पडलेत खाली | कोणत्याही क्षणी दुर्घटना घडण्याची शक्यता

# बोर्लीपंचतन आरोग्य केंद्राची इमारत धोकादायक

। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी।

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत सध्या धोकादायक अवस्थेत असून इमारतीच्या विविध भागांबरोबरच प्रसुतीगृहातील शौचालयाच्या छताच्या स्लॅबचे तुकडे खाली पडत आहेत. यामुळे प्रसुतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची खोलीही धोकादायक स्थितीत आहे.



या आरोग्य केंद्रात दररोज गरोदर महिला, लहान मुले, वृद्ध नागरिक व आपत्कालीन रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र इमारतीची सद्यस्थिती पाहता कोणत्याही क्षणी एखादी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा धोकादायक वातावरणात डॉक्टरांना उपचार करावे लागत आहेत. इमारतीच्या दुरवस्थेमुळे रुग्ण तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या आरोग्य केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सन २००८/९ साली करण्यात आले तेव्हापासन ही इमारत वापरात आहे. गेल्या काही वर्षापासून भिंतींना भेगा पडणे, छतामधून पाणी गळणे, प्लास्टर निखळणे, काही ठिकाणी स्लॅबमधील सळ्या उघड्या पडल्या आहेत. ऑक्टोबर२०२४ ते जानेवारी २०२५ दरम्यान या इमारतीची थोडीफार डागडुजी करण्यात आली. तळमजल्यावरील बाह्यरुग्ण विभाग, प्रसुतीगृह, औषध भांडार, रक्त तपासणी विभाग हा थोडाफार सुस्थितीत असून पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील बांधकाम धोकादायक स्थितीत आहे पुढील संभाव्य धोका लक्षात घेता प्रशासनाने तातडीने या इमारतीची संरचनात्मक तपासणी करून त्यावर योग्य ती कार्यवाही होईपर्यंत आरोग्य कर्मचारी व रुग्णांच्या सुरक्षेच्या दृष्टिने पर्यायी सुरक्षित इमारतीत आरोग्य सेवा सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

> बोर्लीपंचतन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीची मी स्वतः पाहणी केली आहे. इमारतीच्या धोकादायक परिस्थितीबद्दल संरचनात्मक तपासणी करण्याबाबत वरिष्ठांकडे पत्रव्यवहार केला असून त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.
>
> -डॉ.संतोष नारायणकर, तालुका आरोग्य अधिकारी श्रीवर्धन

> जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याबाबत मला माहिती दिली आहे. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाला इमारतीच्या संरचनात्मक तपासणीचा प्रस्ताव देण्यात आला आहे. परिस्थितीचे गांभीर्य पाहून तेथील आरोग्य सेवा इतर इमारतीमध्ये हलवीण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल.
>
> -डॉ.आनंद गोसावी, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी रायगड




## राशीभविष्य

- **मेष** : स्थापत्य, कला या क्षेत्रात संधी लाभतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. बाकी चिंता नसावी.
- **वृषभ** : कामाचा ताण हलका होईल. अपेक्षित वार्तेने समाधान लाभेल. छोटा-मोठा प्रवास घडणार आहे.
- **मिथुन** : नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. अंगभूत कला-गुणांचा विकास होईल. खर्चाचं प्रमाण वाढेल.
- **कर्क** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. व्यवसायात साधारण स्थिती राहील. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **सिंह** : हाती घेतलेल्या कार्यात यश लाभेल. सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कन्या** : मनाजोग्या भेटीगाठी होतील. कला-गुणांना उत्तम वाव मिळेल. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल.
- **तूळ** : अडचणीतून मार्ग निघेल. बेरोजगारांचा दिलासा मिळेल. मित्र-मैत्रिणींच्या भेटी समाधान देतील.
- **वृश्चिक** : व्यवसायात बदल संभवतो. हितशत्रूंच्या कारवायांपासून सावध रहावं. विचारपूर्वक निर्णय घ्या.
- **धनु** : स्थावर प्रश्न तडजोडीने सोडवावे. कर्ज प्रकरणं रखडतील. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील.
- **मकर** : व्यवसायात अनुभवींचं मार्गदर्शन घ्यावं. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : महत्त्वाच्या कार्यात प्रगती होईल. स्थावर प्रश्नात समाधान लाभेल. गुंतवणुकीला चालना मिळेल.
- **मीन** : महत्त्वाच्या कामांना गती मिळेल. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. मानसिक स्वास्थ लाभेल

## २६ डिसेंबर

दिनविशेष

१७२१ : श्रीमंत नानासाहेब पेशवे यांचा जन्म.
१९१४ : थोर समाजसेवक बाबा आमटे यांचा जन्मदिन.
२०१२ : महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना सुचवण्यासाठी निवृत्त महिला न्यायाधीशांच्या एकस्तरीय चौकशी आयोग स्थापनेचा निर्णय.
२०१३ : डॉ. सुधीर प्रभू, अनिता बेनिंजर-गोखले, विनोद बोधनकर, ललित राठी यांना पी.ए. इनामदार सामाजिक कृतज्ञता पुरस्कार जाहीर.
२०१५ : प्रख्यात अभिनेत्री साधना शिवदासानी यांचं निधन

## फळांचे असेही लाभ

आरोग्यमंत्र

फळं कधी खाल्ली पाहिजेत, हे एकदा समजून घेतलं की त्याच्या चांगल्या परिणामांची जाणीव आपल्याला होऊ लागते. संत्रं आणि लिंबासारखी काही फळं अम्लीय असतात. जर फळं खाण्याच्या योग्य पद्धतीवर प्रभुत्व मिळवलं असेल तर सौंदर्य, दीर्घायुष्य, आरोग्य, ऊर्जा, आनंद आणि योग्य वजन यांचं रहस्य समजतं. नेहमी फळांचा ताजा रस प्या. कॅन, पॅक किंवा बाटल्यांमधला फळांचा रस चांगला नसतो. गरम झालेला रसही पिऊ नका. शिजवलेली फळं खाऊ नका, कारण त्यातून पोषक तत्त्वं मिळत नाहीत. आपल्याला फक्त त्याची चव कळते. रस पिण्यापेक्षा फळ खाणं केव्हाही चांगलं. ताज्या फळांचा रस प्यायचा असेल तर तो हळूहळू प्या. हा रस लाळेमध्ये मिसळून शरीरात गेल्यास अनेक लाभ होतात. शरीर स्वच्छ किंवा डिटॉक्सिफाय करण्यासाठी तीन दिवस केवळ फळांवर राहू शकता. तीन दिवस ताजी फळं खा आणि ताज्या फळांचा रस प्या. यामुळे तुमची त्वचा तजेलदार आणि चमकदार दिसू लागेल. डॉ स्टीफन माक टर्मिनल कर्करोगाच्या रुग्णांवर अन-ऑर्थोडॉक्स पद्धतीनं उपचार करतात त्यांचे बरेच रुग्ण बरे झाले आहेत. त्यांची उपचारपद्धती आजारांविरुद्ध शरीरातील नैसर्गिक उपचारांवर विश्वास ठेवते. कर्करोगाचे रुग्ण मरू नयेत, म्हणून त्यांना एक उपचार सापडला. कर्करोगाचा उपचार आधीच सापडला आहे. आपण ज्या प्रकारे फळं खातो त्यावर या उपचार पद्धतीचं यश अवलंबून आहे.



## छोटासा डॉमिनिका

सफर देशांची

डॉमिनिका हे कॅरेबियन समुद्रातलं छोटसं बेट. ख्रिस्तोफर कोलंबसने या बेटाचा शोध लावून त्याला डॉमिनिका नाव दिलं. रोझेयू ही या देशाची राजधानी. डॉमिनिकातल्या जंगलांमध्ये इग्वाना, बोआ कॉन्स्ट्रीक्टर, सशाच्या आकाराचे ॲगोयुटिस नावाचे प्राणी, क्रॅपॅड्स हे भलेमोठे बेडूक आदी आढळतात. इम्पिरियल आणि लाल मानेचे पोपट फक्त इथेच आढळतात. इंग्रजी ही डॉमिनिकातली अधिकृत भाषा. इथे फ्रेंचही बोलली जाते. इथे +आफ्रिकन लोकांच्या वंशजांची संख्या बरीच आहे. यासोबत आशियाई तसंच इतर वंशांचे लोकही इथे राहतात. या देशातली निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्या शहरांमध्ये राहते. १४९३ मध्ये कोलंबस या बेटावर आला होता. १६३० मध्ये फ्रेंचांनी इथे वसाहती तयार केल्या. इथल्या नागरिकांनी आफ्रिकन लोकांना गुलाम बनवून आणलं. ग्रेट ब्रिटनने १७८३ मध्ये या बेटांचा ताबा घेतला. १९७८ मध्ये डॉमिनिकाला स्वातंत्र्य मिळालं. डॉमिनिका हा कॅरेबियन बेटांवरचा सर्वात गरीब देश. इथली अर्थव्यवस्था पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. अधूनमधून येणाऱ्या वादळांमुळे पिकांचं नुकसान होतं. केळं हे इथलं प्रमुख पीक. यासोबत इथे कंदमुळं, आंबट फळं आणि नारळ पिकतात.

## ट्रेंडी लिनन साडी

फॅशन पॅशन

सध्या नजर जाईल तिथे लिननच्या साड्यांची बहार दिसते. लिनन हा फॅशन इंडस्ट्रीतला परवलीचा शब्द बनून गेला आहे. सिल्क किंवा कॉटनला पर्याय म्हणून लिनन साड्या वापरता येतील. विविध क्षेत्रातल्या सेलिब्रिटी अशा साड्या नेसून मिरवत आहेत. या कपड्याचं वैशिष्ट्य सांगायचं तर कोणत्याही वयाच्या महिलेवर ते शोभून दिसतं. रोजचं ऑफिस असो किंवा पार्टी, लिनन साड्या प्रत्येक ऑकेजनची शान ठरतात. योग्य स्टायलिंग आणि ॲक्सेसरीजच्या मदतीने तुम्हीही या साड्यांमध्ये शोभून दिसाल.

* शिफॉन, जॉर्जेट, सिल्क तसंच इतर डिझायनर साड्या ट्रेंडमध्ये असतात. पण कॉटन, हॅण्डलूम कॉटन किंवा लिननची बात कुछ औरच! कॉटनपेक्षा थोडं जाड असणारं लिनन वजनाने हलकं असतं. लिनन साड्या शंभर टक्के हातमागावर विणलेल्या असल्याने त्या खूप सुंदर दिसतात.

* या साड्यांची फार काळजी घ्यावी लागत नाही. हाताने किंवा मशीनमध्ये त्या धुता येतात. धुतल्यानंतर लिनन मऊ पडतं. त्यामुळे साडी नेसल्यानंतर खूप आरामदायी वाटतं. (क्रमशः)

## पंचांग

**शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
पौष शु. ६, चंद्रराशी : कुंभ,
नक्षत्र : शततारका, योग : सिद्धि,
सूर्योदय ७.११, सूर्यास्त १८.०६

## फॉरवर्डस

**कौन कहता हैं क़ी दूरियाँ क़दमों से नापी जातीं हैं...**

**यहाँ तों ख़ुद से मिलनें में भीं उम्र गुजऱ जाती हैं...!**

## वेगळ्या वाटा

लेखन क्षेत्राचं रुपडं बदलत आहे. डिजिटल माध्यमांचा वाढता वापर, वाचनाच्या बदललेल्या आवडीनिवडी यामुळे लेखन आणि वाचनाशी संबंधित नवे ट्रेंड येत आहेत. या नव्या ट्रेंडचा भाग बनायचं असेल तर बदलांचा स्वीकार करायलाच हवा. स्व प्रकाशन म्हणजे सेल्फ पब्लिशिंग हा याच ट्रेंडचा एक भाग आहे. नवे, होतकरू युवा लेखक सध्या या पर्यायाचा गांभीर्याने विचार करत आहेत. लेखक म्हणून नाव कमवायचं असेल आणि सेल्फ पब्लिशिंगचा मार्ग धुंडाळायचा असेल तर काय करायला हवं याविषयी... (क्रमशः)

## स्टेम सेल रिसर्चची नवी वाट

करिअरवाटा

सध्याच्या आधुनिक युगात वैद्यकीय क्षेत्रात बरंच संशोधन होत आहे. त्यातून अनेक दुर्धर व्याधी बऱ्या करण्यासाठी स्टेम सेल उपचारपद्धती लाभदायक ठरत असल्याचं दिसून येत आहे. साहजिक येत्या काळात या क्षेत्राचा विस्तार होणार असून इच्छुकांना या क्षेत्रामध्ये उत्तम काम करता येण्यासारखं आहे. केवळ मेडिकल क्षेत्राशी संबंधित उमेदवार या क्षेत्रामध्ये कारकीर्द घडवू शकतात असा गैरसमज आहे. वस्तुत: सामान्य जीवशास्त्र शाखेतील विद्यार्थीही या शाखेत काम करू शकतात. काही वेगळं करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी हे योग्य क्षेत्र आहे. बायोलॉजिकल सायन्समधला बीएससी ग्रॅज्युएट, एमबीबीएस, बीफार्म, बीई बायोटेक्नॉलॉजी पदवीधारक स्टेम सेल रिसर्चमध्ये काम करू शकतो. भारतात अनेक संस्था या थेरपीवर संशोधन करत आहेत. फॉर्मास्युटीकल आणि बायोटेक्नॉलॉजीमधील कंपन्या तसंच प्रमुख स्टेम सेल्स संस्था या थेरपीवर संशोधन करत आहेत. यामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेणारे उमेदवार दरमहा उत्तम आर्थिक प्राप्ती करू शकतात. पीएच.डीनंतर या उत्पन्नात वरचेवर वाढ होत राहते. या संदर्भातील प्रशिक्षण देणाऱ्या संस्था बंगळूर, पुणे, मुंबई, हैदराबाद आदी ठिकाणी कार्यरत आहेत. या क्षेत्रातील उत्तम कारकीर्दीच्या संधीचा अवश्य विचार करावा..



## खेचाखेची

### बारीक पिनचा चार्जर

एक मुलगी घरातून पळून जाऊन लग्न करते...
.
.
आणि ३ दिवसांनी परत घरी येते.
**वडील(रागाने)**: आता काय हवंय?
.
.
.
**मुलगी:** बारीक पिनचा चार्जर...!

## वेगळं काही

सध्या सगळीकडे चांगलीच थंडी पडली आहे. पारा खाली घसरतो आहे. थंडीने बरेच विक्रम मोडले आणि नवे प्रस्थापित केले. अशा परिस्थितीत जगातलं सर्वात ठिकाण कोणतं, असा प्रश्न पडणं अगदी स्वाभाविक आहे. रशियातल्या सायबेरियातलं नॉरिल्स्क हे जगातलं सर्वात थंड शहर मानलं जातं. इथल्या रहिवाशांना डिसेंबर आणि जानेवारी असे दोन महिने सूर्यानारायणाचं दर्शनही होत नाही. इथे वर्षातल्या ३६५ दिवसांपैकी २७० दिवस बर्फ साठलेला असतो. या शहरातली लोकसंख्या एक लाख ७५ हजारांच्या आसपास आहे. हिवाळ्यात इथलं किमान तापमान उणे ६१ अंश तर सरासरी तापमान उणे दहा अंश सेल्सियस असतं. (क्रमशः)

## आलू सोयाबीन कोफ्ता करी

रूचिरा

एकाच पद्धतीच्या भाज्यांऐवजी सोयाबीन आलू कोफ्ता करी करून पाहा.

**साहित्य** : अर्धा कप सोया क्रंच, दोन उकडलेले बटाटे, चार टोमॅटो, एक इंच आलं, एक हिरवी मिरची, चिरलेली कोथिंबीर, तीन चमचा बेसन, अर्धा चमचा जिरं, एक चमचा कस्तुरी मेथी, पाव चमचा हळद, चमचाभर लाल तिखट, दीड चमचा धनेपूड, पाव चमचा गरम मसाला, मीठ, तेल, तमालपत्र, दालचिनी, ३ लवंग, ६-७ काळी मिरी, एक मोठी वेलची.



**कृती** : सोयाबीन क्रंचेस कुटून अर्धा कप गरम पाणी घालून भांडं झाका. दहा मिनिटांनी कुस्करलेले बटाटे, मीठ, धनेपूड, लाल तिखट, हिरवी मिरची, हळद, कोथिंबीर, बेसन घाला. मिश्रण एकजीव करा. तेल गरम करून मिश्रणाचे गोळे तळा. करीसाठी आलं, टोमॅटो, हिरवी मिरची मिक्सरमध्ये वाटून घ्या. तेल गरम करून जिरं, गरम मसाला घाला. हळद, धनेपूड परतून टोमॅटो, आलं-मिरची पेस्ट, कस्तुरी मेथी घाला. कढईतल्या मसाल्यात बेसन, दीड कप पाणी, गरम मसाला पावडर, कोथिंबीर घाला. ग्रेवी उकळू द्या. नंतर थोडं क्रीम, चवीनुसार मीठ घाला. झाकण ठेवून धीम्या आचेवर ग्रेवी शिजवा. शेवटी कोफ्ते ग्रेवीमध्ये मिसळा. गरम खायला द्या.

## सुडोकू ४३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | | | ९ | | | |
| ९ | ५ | | | | १ | ६ | | |
| | | | | | ८ | ९ | | ५ |
| १ | | | ९ | ५ | २ | ७ | | ३ |
| | | | | ६ | | | | |
| ६ | | ७ | ८ | १ | ३ | | | ४ |
| ३ | | २ | १ | | | | | |
| | | ९ | २ | | | | ४ | ६ |
| | | | ७ | | | | | ८ |

**टीप -**
✽ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✽ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✽ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ४२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८ | ६ | २ | १ | ४ | ५ | ९ | ७ |
| २ | ४ | ५ | ९ | ३ | ७ | ८ | १ | ६ |
| १ | ७ | ९ | ८ | ६ | ५ | ३ | २ | ४ |
| ५ | ६ | १ | ७ | ९ | ८ | २ | ४ | ३ |
| ९ | ३ | ४ | १ | २ | ६ | ७ | ५ | ८ |
| ८ | २ | ७ | ४ | ५ | ३ | ९ | ६ | १ |
| ७ | ५ | २ | ६ | ८ | १ | ४ | ३ | ९ |
| ४ | १ | ३ | ५ | ७ | ९ | ६ | ८ | २ |
| ६ | ९ | ८ | ३ | ४ | २ | १ | ७ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ४३



**आडवे शब्द :-**
१) मुंज, मौजीबंधन
५) वेगळा (हिं.)
८) कापडाचा अखंड गठ्ठा
९) उद्याच्या नंतरचा दिवस
१०) योग्य, उचित
११) अस्थिर होणे, हलणे
१४) नभ
१५) स्वत:बद्दलची कमीपणाची भावना
१६) वक्र
१७) चांदी
१९) गाठोडे बांधण्याचे फडके
२०) विश्व
२१) नाश पावणारे
२२) पदार्थाचा सूक्ष्म भाग, अणु
२४) उद्दिष्ट, नियम
२७) मध
२९) भेग वाढविणारी खुंटी
३०) *** गाडगे
३२) जगाचे कालचक्र
३३) डावा
३५) जपजाप्य
३७) अंत:करण
३८) बारीकसारीक
४१) मालक
४२)पर्वत
४४) नाचणी
४५) शंभर
४८) कथिल व तांबे यांचा मिश्र धातू
५०) सरसकट
५२) हवेतील गारवा
५५) जंगलातील प्राणी
५७) बासरी
५८) केस कापणे
६०) रंग (इं.)
६२) पोलिस
६३) मीठ
६४) बशीचा जोडीदार
६५) आघात, प्रहार
६६) मान खाली घातलेला
६७) रुपेरी मुलामा.

**उभे शब्द :-**
१) मेहेरबानी
२) पंख
३) नव प्रवेशित
४) नजरेचा तीर
५) निरर्थक
६) विपुल, पुरुन उरेल इतके
७)चंद्र
८) फौजदार ठाण्याचा प्रमुख
१२) केळवण
१३) खिडकी
१८) माय बाप
२२) कदर करणारा
२३) अनुमती
२५) गावातील विद्वान, सावकार
२६) गुरांचा घोळका
२८) वर्ण
२९) गावाचा कारभार पाहणारा--एक पद
३१) गाडीवे छत
३४) चामखीळ
३६) त्रास, बडबड
३७) मधुमक्षिका
३९) मोठी टोपली
४०) सोने
४३) हत्ती
४५) मंदवासर
४६) कारस्थान
४७) आजच्या आधीचा दिवस
४९) स्तोत्र, स्तुतीची गाणी
५०) पावसाची झड
५१) पत्र
५३) समशेर
५४) खिडकीची पातळ काच
५६) छोटी लढाई
५९) पुन्हा
६०) वाळवी, उणीव
६१) डोळ्यावरील उघडझापीचा अवयव
६२) वायू, पाहिजे
६३) योग्य, वाजवी
६४) मिठी, विळखा.

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# निवडक

## तळ्यात आजपासून खासदार चषक

**तळा :** प्रदीर्घ कालावधी नंतर पहिल्यांदाच तळा तालुक्यात क्रिकेटचा भव्य थरार रंगणार आहे तळा पंचायत समितीचे माजी सभापती रविंद्र गोविंद नटे यांच्या संकल्पनेतून खासदार चषक



२०२५ भव्य मर्यादित क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. २६, २७,२८ डिसेंबर २०२५ रोजी आनंद वाडी येथे क्रिकेटचा थरार रंगणार आहे. तळा, पंचायत समितीचे माजी सभापती यांनी खासदार चषकाचे आयोजन केले आहे. तळा तालुका क्रिकेट असोसिएशन आणि तळा क्रिकेट असोसिएशन यांचे त्यांना सहकार्य लाभणार आहे.या भव्य क्रिकेट स्पर्धेत प्रथम पारितोषिक १,००००० रुपये व आकर्षक चषक द्वितीय पारितोषि ५०,००० रुपये व आकर्षक चषक, तृतीय पारितोषिक २५,००० रुपये व आकर्षक चषक त्याचप्रमाणे सर्वोत्कृष्ट खेळाडू, सर्वोत्कृष्ट गोलंदाज, सर्वोत्कृष्ट फलंदाज, षटकार किंग, सामनावीर यांना सन्मानित करण्यात येणार आहे.या स्पर्धेत विविध संघांनी सहभाग घेतला असून, तरुण खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे.त्यामुळे क्रिकेट रसिकांनी उपस्थित राहून आनंद घ्यावा असे आवाहन माजी सभापती रविंद्र नटे यांनी केले आहे.

## पॅट कमिन्स चौथ्या कसोटीबाहेर

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सला इंग्लंडविरुद्ध शुक्रवारी मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर (एमसीजी) सुरू होणाऱ्या चौथ्या ॲशेस कसोटीसाठी विश्रांती देण्यात आली आहे. तर, जायबंदी नेथन लायनच्या जागी संघात टॉड मर्फीला स्थान देण्यात आले आहे. मर्फी बॉक्सिंग डे (२६ डिसेंबर) सामन्यात तो ऑस्ट्रेलियात आपला पहिला कसोटी सामना खेळण्यास तयार आहे. मंगळवारी जाहीर करण्यात आलेल्या १५ सदस्यीय संघात मॅट कुनमन आणि कोरी रोकिचिओली ऐवजी मर्फीला प्राथमिकता देण्यात आली आहे. ऑस्ट्रेलियाने ॲडलेड येथील तिसरा कसोटी सामना जिंकत ॲशेस कायम राखली आहे. जूनपासून पाठीच्या दुखापतीमुळे त्रस्त असलेल्या कमिन्सने तिसऱ्या कसोटी पुनरागमन केले होते. मात्र, पुढील कसोटीसाठी त्याला विश्रांती देण्यात येईल. स्टीव्ह स्मिथ अस्वस्थ असल्याने तिसऱ्या कसोटी सामना खेळू शकला नाही. मात्र, तो आता ठीक असण्याची अपेक्षा आहे. कमिन्सच्या अनुपस्थितीत तो पुन्हा एकदा संघाचे नेतृत्व करेल. झाय रिचर्डसनला संघात स्थान देण्यात आले आहे.स्टीव्ह स्मिथ, स्कॉट बोलंड, ॲलेक्स कॅरी, ब्रेंडन डॉगेट, कॅमेरून ग्रीन, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, उस्मान ख्वाजा, मार्नस लबूशेन, टॉड मर्फी, मायकल नेसर, झाय रिचर्डसन, मिचेल स्टार्क, जेक वेदराल्ड, ब्यू वेबस्टर यांचा संघात समावेश करण्यात आला आहे.

## यश दयालचा अटकपूर्व जामीन नाकारला

**जयपूर :** आयपीएलमध्ये आरसीबीकडून खेळणारा उत्तर प्रदेशचा वेगवान गोलंदाज यश दयाल याला कोर्टाकडून मोठा झटका बसला आहे. जयपूर बलात्कार आणि लैंगिक अत्याचार प्रकरणात अल्पवयीन मुलाशी संबंधित यश दयालला अटकपूर्व जामीन नाकारण्यात आला आहे. न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की, आरोपीला खोटे गुंतवण्यात आले आहे असे दिसत नाही. जयपूरमधील पोक्सो न्यायालयाने वेगवान गोलंदाज यश दयालचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. जयपूर महानगर प्रथम विभागाच्या पोक्सो न्यायालय क्रमांक ३ ने यश दयालचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे. यश दयालला आता तुरुंगात जाण्याची हमी नाही. कारण त्याच्याकडे अजूनही उच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय आहे. या वर्षी जुलैमध्ये वेगवान गोलंदाज यश दयालविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला होता. बलात्काराच्या गुन्ह्यात अडकलेला यश दयाल तेव्हापासून क्रिकेटच्या मैदानापासून दूर आहे. जयपूरमधील सांगानेर सदर पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला होता. त्याच्यावर १७ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि लैंगिक अत्याचाराचा आरोप आहे. दयालचे वकील कुणाल जैमन यांनी असा युक्तिवाद केला की दयाल फक्त सार्वजनिक ठिकाणी मुलीला भेटला, एकटा कधीच नाही. तिने स्वतःला प्रौढ म्हणून सादर केले. आर्थिक अडचणींचे कारण देत त्याच्याकडून पैसे स्वीकारले आणि नंतर आणखी पैसे मागितले. बचाव पक्षाने असाही दावा केला की गाझियाबादमधील एक संबंधित प्रकरण त्याच कथित खंडणी कटाचा भाग आहे. या युक्तिवादांना न जुमानता, जयपूर न्यायालयाने दयालचा अटकपूर्व जामीन नाकारला. आपल्या याचिकेत, वेगवान गोलंदाजाने असा युक्तिवाद केला की, त्याच्यावरील आरोप खोटे आहेत.

## सतीचा माल येथील क्रिकेट मैदानाचे उद्घाटन



**नागोठणे :** नागोठण्यातील सतीचा माल या मैदानावर माझ्या अनेक जुन्या आठवणी जोडलेल्या आहेत. याच मैदानावर त्यावेळी आम्ही क्रिकेट खेळलो आणि एकमेकांशी भांडलो. या मैदानाकडे दुर्लक्ष झाल्याने येथे क्रिकेट खेळणे अनेक वर्षे बंद झाले होते. मात्र नागोठणे ग्रामपंचायतीत सत्तेत असलेल्या आमच्या टीमने चांगले काम करून हे मैदान चांगल्या पद्धतीने तयार केले आहे. सरपंच सुप्रियाताई महाडिक, डॉ. मिलिंद धात्रक, अखलाक पानसरे, ज्ञानेश्वर साळुंखे, सचिन ठोंबरे व सर्व टीमला याचे श्रेय जाते. पूर्वीच्या व आताच्या मैदानात जमीन आसमानचा फरक झाल्याचे आता दिसून येत आहे. या मैदानात थेट गाडी येण्यासाठी साकव व मैदानात असलेले विजेचे खांब हटविणे या दोन गोष्टींची लवकरच पूर्तता करून या मैदानावर जिल्ह्यातील खेळाडू खेळावेत यासाठी भविष्यात येथे जिल्हास्तरीय क्रिकेट महोत्सव होण्यासाठी तसेच या मैदानासाठी क्रीडा निधी मिळविण्यासाठी मी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन शिवसेना उबाठा नेते व नागोठणे ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक किशोरशेठ यांनी केले

# विजय हजारे ट्रॉफी
# पहिल्याच दिवशी २२ शतकं

## फलंदाजांनी मोडले अनेक विक्रम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ च्या हंगामाला जबरदस्त सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी तब्बल २२ खेळाडूंनी शतक झळकावलं. यात एका द्विशतकाचाही समावेश आहे. बिहारने सर्वाधिक धावसंख्या करत विक्रम घडवला. त्यांनी विजय हजारे ट्रॉफीत धावांच्या फरकानं सर्वात मोठा विजय नोंदवला. वैभव सूर्यवंशीने तुफान फटकेबाजी केली. पहिल्या दिवशी अनेक विक्रम झाले.

विजय हजारे ट्रॉफीत एका दिवसात सर्वाधिक २२ शतकांचा विक्रम झाला. याआधी १२ डिसेंबर २०२१ आणि ३ जानेवारी २०२५ या दोन दिवशी प्रत्येकी १९ शतकं झाली होती.५७४ धावांचा विक्रमबिहारने अरुणाचलविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना ६ बाद ५७४ धावा केल्या होत्या.



एका डावातील ही सर्वात मोठी धावसंख्या ठरलीय. या फॉरमॅटमध्ये दुसरी सर्वात मोठी संख्यासुद्धा अरुणाचलविरुद्धच उभारली होती. २०२२-२३ च्या विजय हजारे ट्रॉफीत तामिळनाडुने २ बाद ५०६ धावा केल्या होत्या.

**३९७ धावांनी विजय**

बिहारने सर्वात मोठी धावसंख्या करताना सर्वात मोठ्या दुसऱ्या विजयाची नोंद केली. ३९७ धावांनी विजय मिळवत त्यांनी पुरुषांच्या लिस्ट ए क्रिकेटमध्ये दुसरा सर्वात मोठा विजय मिळवला.वैभव सूर्यवंशीलिस्ट ए क्रिकेटमध्ये शतक करणारा सर्वात तरुण फलंदाज होण्याचा विक्रम वैभव सूर्यवंशीने केला. १४ वर्षे २७२ दिवस वय असताना त्यानं शतक झळकावलंय. याआधी जहूर इलाही यांनी १९८६ मध्ये १५ वर्षे २०९ दिवस वय असताना शतक केलं होतं.

**कर्नाटकचा यशस्वी पाठलाग**

अहमदाबादमध्ये कर्नाटकने झारखंड विरुद्ध ४१३ धावांचा यशस्वी पाठलाग केला. विजय हजारे ट्रॉफीत याआधी २०११-१२ मध्ये गोव्या विरुद्ध खेळताना आंध्र प्रदेशनं ३८४ धावांचं आव्हान यशस्वीरित्या पेललं होतं.९ षटकात ११६ धावाअरुणाचलच्या मिबोम मोसूनं ९ षटकात ११६ धावा दिल्या. पुरुषांच्या लिस्ट ए क्रिकेटमध्ये तो सर्वात महागडा गोलंदाज ठरला. याआधी नेदरलँडच्या बास डी लिडे यानं ऑस्ट्रेलियाविरुद्ध ११५ धावा दिल्या होत्या.

### ३२ चेंडूत शतक

**बिहारच्या साकिबुल गनीने ३२ चेंडूत शतक झळकावलंय. पुरुषांच्या लिस्ट ए क्रिकेटमध्ये भारतीयाकडून सर्वात वेगवान शतक आहे. याआधीचं वेगवान शतक ३५ चेंडूत अनमोलप्रीत सिंहने २०२४ मध्ये अरुणाचलविरुद्ध केलं होतं.एबी डी विलियर्सचा विक्रम मोडलावैभव सूर्यवंशीनं ५९ चेंडूत १५० धावा केल्या. पुरुषांच्या लिस्ट ए क्रिकेटमधील या सर्वात वेगवान दीडशे धावा आहेत. वैभव सूर्यवंशीनं दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज फलंदाज एबी डी विलियर्सचा विक्रम मोडला. डी विलियर्सनं २०१५ च्या वर्ल्ड कपमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध ६४ चेंडूत १५० धावा केल्या होत्या.**

### द्विशतकानंतरही पराभव

**ओडिशाच्या सवास्तिक सामलनं सौराष्ट्रविरुद्ध २१२ धावांची जबरदस्त खेळी केली. मात्र तरीही संघाला पराभवाचा धक्का बसला. लिस्ट ए क्रिकेटमध्ये द्विशतक केलेल्या खेळाडूच्या संघाचा पराभव होण्याची दुसरी वेळ आहे. याआधी बेन डंकने २०१४ मध्ये नाबाद २२९ धावा केल्या होत्या. तरीही संघाचा पराभवा झाला होता.एका सामन्यात ६ झेलत्रिपुरातील सामन्यात केरळमधील विघ्नेश पुथुरनं ६ झेल पकडले. यात एक झेल त्यानं स्वत:च्याच गोलंदाजीवर पकडला होता. पुरुषांच्या लिस्ट ए सामन्यात सहा झेल घेणारा तो पहिलाच क्षेत्ररक्षक बनलाय.**

## ‘फिफा’ होणार मालामाल!

**झुरिच :** जगभरातील तमाम फुटबॉलप्रेमींना ११ जून २०२६ पासून खेळवल्या जाणाऱ्या फिफा फुटबॉल वर्ल्डकपचे आतापासूनच वेध लागले आहेत. या आगामी स्पर्धेचे आयोजन अमेरिका, मेक्सिको व कॅनडा यांच्या संयुक्त विद्यमाने केले जाणार आहे. अगदी दस्तुरखुद्द फिफासाठी देखील ही स्पर्धा अनन्यसाधारण महत्त्वाची असते. याचे कारण म्हणजे फिफाच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोतदेखील या वर्ल्डकपच्या माध्यमातून होणारी कमाई हाच आहे.केवळ फिफाच नव्हे, तर फिफाशी संलग्न असलेल्या २११ देशांचीदेखील या वर्ल्डकपमुळे आर्थिकदृष्ट्या बल्ले बल्ले होणार आहे. एका अभ्यासानुसार, या आगामी फुटबॉल विश्वचषकातून फिफाची कमाई थोडीथोडकी नव्हे, तर चक्क ९.९६ लाख कोटींपर्यंत सहज होणार आहे. जगभरात फुटबॉल जितके रुजले आहे, त्याचे फिफाकडून होणारी गुंतवणूक हे देखील मुख्य कारणांपैकी एक आहे. यापूर्वी फिफाला जितके उत्पन्न मिळाले, त्याच्या ९० टक्के रक्कम त्यांनी फुटबॉलच्या विकासाचे प्रकल्प राबवण्यात खर्च केली आहे.

# हॉकीपटू हार्दिक सिंगला खेलरत्न

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

भारतीय हॉकी संघाचे उपकर्णधार हार्दिक सिंग यांना २०२५ चा मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार मिळेल. हार्दिक हे एकमेव खेळाडू आहेत, ज्यांच्या नावासाठी निवड समितीने शिफारस केली आहे. २७ वर्षीय हार्दिक सिंग टोक्यो २०२१ आणि पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये पदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग होते. त्यांनी या वर्षी आयोजित आशिया कपमध्ये सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती

बुधवारी निवड समितीच्या बैठकीत अर्जुन पुरस्कारासाठी नावांची शिफारस करण्यात आली. यात चे उपाध्यक्ष गगन नारंग, माजी बॅडमिंटनपटू अपर्णा




पोपट आणि माजी हॉकीपटू एमएम सोमय्या यांचा समावेश होता.

समितीने बुद्धिबळपटू दिव्या देशमुख आणि डेकॅथलॉन ॲथलीट तेजस्विन शंकर यांच्यासह २४ खेळाडूंना अर्जुन पुरस्कारासाठी निवडले आहे. यावेळी क्रीडा पुरस्कारांच्या यादीत कोणत्याही क्रिकेटपटूचे नाव नाही.

या यादीत कोणत्याही क्रिकेटपटूचे नाव समाविष्ट नाही. यापूर्वी मोहम्मद शमीला २०२३ मध्ये हा सन्मान मिळाला होता. खेल रत्न हा देशाचा सर्वोच्च क्रीडा सन्मान आहे, ज्यात पदक, प्रशस्तिपत्र आणि २५ लाख रुपयांची रोख रक्कम दिली जाते. तर अर्जुन पुरस्कारांतर्गत १५ लाख रुपये मिळतात.

### योगासन खेळाडूला पहिल्यांदा अर्जुन पुरस्कार

पहिल्यांदा योगासन खेळाशी संबंधित खेळाडू आरती पाल यांना अर्जुन पुरस्कारासाठी शिफारस करण्यात आली आहे. क्रीडा मंत्रालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर ५ वर्षांनी कोणत्याही योगासन खेळाडूची निवड झाली आहे. आरती सध्या राष्ट्रीय आणि आशियाई चॅम्पियन आहेत. योगासनला २०२६ च्या आशियाई खेळांमध्ये प्रात्यक्षिक खेळ म्हणून समाविष्ट केले जाईल.

### दिव्या अर्जुन पुरस्कार मिळवणारी पहिली महिला बुद्धिबळपटू

२० वर्षीय दिव्या देशमुख वर्ल्ड कप जिंकणारी पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू आहे. बुद्धिबळपटू विदित गुजरातीलाही अर्जुन पुरस्कारासाठी निवडण्यात आले आहे. तर, तेजस्विन शंकरने २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. तो याच वर्षी आशियाई चॅम्पियनशिपमध्येही दुसऱ्या स्थानावर राहिला. रायफल शूटर मेहुली घोष, जिम्नॅस्ट प्रणती नायक आणि महिला बॅडमिंटनची नंबर एक जोडी त्रिसा जॉली-गायत्री गोपीचंद यांचाही अर्जुन पुरस्कारासाठी शिफारस केलेल्यांमध्ये समावेश आहे.

# टी-२० क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच!

## एका ओव्हरमध्ये ५ विकेट्स, पठ्ठ्याने रचला अशक्य पराक्रम, सगळेच चक्रावले

**। बाली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेटच्या मैदानात क्वचितच असे क्षण येतात, जे खेळाच्या सुवर्णपानांवर कायमचे कोरले जातात. बाली येथे खेळल्या गेलेल्या एका टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात असाच एक ऐतिहासिक क्षण पाहायला मिळाला. इंडोनेशियाचा युवा वेगवान गोलंदाज गेडे प्रियांदना याने अशक्य वाटणारा पराक्रम करून दाखवत क्रिकेटविश्वाला थक्क केले. एका ओव्हरमुळे प्रियनदानाचे नाव अशा विक्रमांच्या पानावर कोरले गेले आहे, जिथे आजवर जगातील मोठमोठे दिग्गज गोलंदाजही पोहोचू शकले नव्हते.

बाली येथे कंबोडियाविरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्यात पार्टटाइम वेगवान गोलंदाज प्रियांदनाने १ ओव्हरमध्ये फक्त १ रन देत तब्बल ५ विकेट्स घेतल्या. टी इंटरनॅशनल क्रिकेटच्या इतिहासात असे करणारा तो पहिलाच गोलंदाज ठरला आहे.

पुरुष क्रिकेटच नव्हे, तर महिला टी २० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही आजवर कोणालाही एका ओव्हरमध्ये ५ विकेट्स घेता आलेल्या नव्हत्या. यापूर्वी अनेक गोलंदाजांनी एका ओव्हरमध्ये ४ विकेट्स घेतल्या आहेत, मात्र ५ विकेट्सचा टप्पा कोणीही गाठू शकले नव्हते. प्रियांदनाच्या या भेदक गोलंदाजीच्या जोरावर इंडोनेशियाने हा सामना ६० धावांनी जिंकला.

या सामन्यात इंडोनेशियाने प्रथम फलंदाजी करत ५ विकेट्सच्या मोबदल्यात १६७ धावा केल्या. सलामीवीर आणि यष्टिरक्षक धर्मा केसुमा यांनी नाबाद ११० धावांची शानदार



खेळी केली. लक्ष्याचा पाठलाग करताना कंबोडियाने १५ षटकांत ५ विकेट्स गमावत १०६ धावा केल्या होत्या. तेव्हाच कर्णधाराने चेंडू गेडे प्रियांदनाकडे सोपवला.

चेंडू हातात येताच त्याने कहर केला. पहिल्या तीन चेंडूवर त्याने शाह अबरार हुसेन, निर्मलजीत सिंग आणि चानथोयून रथानक यांना बाद करत हॅट्ट्रिक साधली. पुढचा एक चेंडू वाया गेला, आणि त्यानंतर मोंगदारा सोक व पेल वेन्नक यांनाही तंबूत पाठवले. कंबोडियाचा संपूर्ण संघ १०७ धावांवर ऑलआउट झाला.

इतिहास रचूनही गेडे प्रियांदनाला प्लेअर ऑफ द मॅच पुरस्कार मिळाला नाही, हे विशेष ठरले. हा सन्मान धर्मा केसुमाला मिळाला. त्याने ६८ चेंडूमध्ये नाबाद ११० धावा करताना ८ चौकार आणि ६ षटकार लगावले. केसुमाची ही खेळी इंडोनेशियासाठी निर्णायक ठरली, कारण इतर कोणताही फलंदाज २० धावांचाही आकडा गाठू शकला नव्हता.

# वरिष्ठांच्या कामगिरीत सातत्याचा अभाव

## युवा खेळाडूंकडून मात्र उज्ज्वल भविष्याची आशा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय कुस्तीसाठी आव्हानात्मक ठरलेल्या २०२५ या वर्षात वरिष्ठ स्तरावर पदकांची संख्या समाधानकारक नसली, तरी कनिष्ठ स्तरावरील खेळाडूंनी केलेल्या चमकदार कामगिरीमुळे उज्ज्वल भविष्याची आशा कायम राहिली आहे.

अंतिम पंघालचे सातत्यमॅटवर अंतिम पंघाल ही भारताची सर्वात सातत्यपूर्ण वरिष्ठ खेळाडू म्हणून समोर आली. महिलांच्या ५३ किलो वजनी गटात खेळताना या हरियाणाच्या मल्लाने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकावून भारताचे अस्तित्व राखले. अंतिमने कांस्यपदकाच्या लढतीत दाखवलेला दबदबा आणि दडपण हाताळण्याची तिची शैली, यामुळे ती जागतिक स्तरावरील अव्वल खेळाडू असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. तिने आशियाई अजिंक्यपद स्पर्धेतही तिसरे स्थान पटकावले आणि वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून वर्षाचा समारोप केला. वरिष्ठ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील भारताची एकूण कामगिरी निराशाजनक राहिली. अंतिमचे कांस्यपदक हे या स्पर्धेतील भारताचे एकमेव पदक ठरले. अनेक मल्लांना सुरुवातीच्या फेरीतच निसटता पराभव पत्करावा लागला. आशियाई स्तरावर मात्र मनीषा भानवाला हिने सुवर्णपदक जिंकून आपली छाप पाडली.

अमन सेहरावतवरील अनपेक्षित बंदीगतवर्षी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारा सर्वात तरुण भारतीय ठरलेला अमन सेहरावत याच्यासाठी हे वर्ष चढ-उतारांचे राहिले. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत वजन जास्त भरल्याने त्याला अपात्र ठरवण्यात आले आणि त्याच्यावर बंदी घालण्यात आली. भारतीय कुस्ती महासंघाची बिनशर्त माफी मागितल्यानंतर त्याची बंदी उठवण्यात आली आणि त्याने देशांतर्गत स्पर्धांमध्ये पुनरागमन केले.

### नेहा आणि रितिकावर बंदीची कुऱ्हाड

**युथ (यू-२०) जागतिक स्पर्धेत वजन जास्त भरल्याने नेहा सांगवानलाही बंदीचा सामना करावा लागला. तसेच, भारताची प्रतिभावान मल्ल रितिका हुडा (७६ किलो) हिच्यावर उत्तेजक द्रव्य सेवन (डोपिंग) प्रकरणी बंदी घालण्यात आली. यामुळे जड वजनी गटात भारताच्या पदकाच्या संधीला मोठा फटका बसला.**

## करनबीर षटकारांचा नवा बादशाह

**नवी दिल्ली :** क्रिकेटच्या मैदानात २०२५ हे वर्ष षटकारांच्या आतषबाजीसाठी ओळखले जाईल. मात्र, या वर्षात सर्वाधिक आंतरराष्ट्रीय षटकार ठोकण्याचा मान एका अशा खेळाडूने मिळवला आहे, ज्याचे नाव ऐकून दिग्गजही चकित होतील.

ऑस्ट्रियाच्या करनबीर सिंह याने २०२४ मध्ये पदार्पण केल्यानंतर अवघ्या एका वर्षातच षटकारांचा नवा बादशाह म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. २०२५ मध्ये सर्वाधिक आंतरराष्ट्रीय षटकार मारण्याच्या यादीत करनबीर सिंह अव्वल स्थानी आहे. त्याने या वर्षात ३२ सामने खेळताना तब्बल १२२ षटकार ठोकले. विशेष म्हणजे, या कालावधीत १०० षटकारांचा आकडा पार करणारा तो जगातील एकमेव फलंदाज ठरला आहे. हे सर्व षटकार त्याने टी-२० फॉरमॅटमध्ये मारले आहेत.

## मोहोपाडा प्रिआ शाळेत क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**रसायनी :** मोहोपाडा प्रिआ स्कूलच्या प्रांगणात वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना व सुप्त गुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्या अंगी स्फूर्ती निर्माण व्हावी यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापिका व उपमुख्याध्यापिका सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत शाळेचे क्रीडा शिक्षक व्यंकटेश थेवर, जस्वीर सिंग, प्राजक्ता शेजवळ, जयेश भाट यांच्या हस्ते मशाल प्रज्वलन करून करण्यात आली.

## आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप हर्डल क्वीन हे नाव सार्थ ठरवले

# ज्योती याराजीला १०० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्ण

**। गुमी । प्रतिनिधी ।**

कधीकधी विजयाचा जल्लोष करण्यासाठी हजारो प्रेक्षकांची गरज नसते, तर कधीकधी टाळ्यांच्या कडकडाटापेक्षा डोळ्यांतून वाहणारे अश्रूच खूप काही सांगून जातात. दक्षिण कोरियाच्या गुमी येथे झालेल्या आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या ज्योती याराजीने १०० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला. पण आज या विजयापेक्षा तिचा तो पदक स्वीकारतानाचा भावुक व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला आहे.

सतत पडणारा पाऊस आणि प्रेक्षकांविना रिकामे पडलेले स्टेडियम अशा शांत वातावरणात तिरंगा फडकवला जात होता आणि राष्ट्रगीत वाजत होते. पोडियमवर एकटी उभी असलेली ज्योती आपले सुवर्णपदक हातात धरून ओल्या डोळ्यांनी तिरंग्याकडे पाहत होती.

तिच्या आजूबाजूला ना कॅमेऱ्यांचा गराडा होता, ना टाळ्यांचा कडकडाट. क्रिकेट आणि फुटबॉलच्या वेडापायी गल्लीबोळात गर्दी करणाऱ्या आपल्या देशात या लेकीच्या विजयाचा साक्षीदार म्हणून तिथे कोणीच नव्हते.

आंध्र प्रदेशच्या विशाखापट्टणममधील एका अत्यंत साधारण कुटुंबात ज्योतीचा जन्म



झाला. वडील सूर्यनारायण एका खाजगी कंपनीत सुरक्षा रक्षक आहेत. आई कुमारी दुसऱ्यांच्या घरी घरकाम करून कुटुंबाला हातभार लावते. अत्यंत मर्यादित संसाधनांत वाढलेल्या ज्योतीने २०१५ मध्ये पहिल्यांदा जिल्हास्तरावर सुवर्ण जिंकले आणि तिथून तिचा प्रवास सुरू झाला. २०१७ मध्ये तिने लांब उडी सोडून हर्डल्स निवडले आणि हाच निर्णय तिच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला.

ज्योतीचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नेटिझन्स हळहळ व्यक्त करत आहेत. ज्या खेळाडूसाठी स्टेडियम भरले असायला हवे होते, ती तिथे एकटी उभी आहे, अशा कमेंट्स करत युजर्स भारतीय क्रीडा संस्कृतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. क्रिकेटच्या प्रेमात ॲथलेटिक्समधील ही खेळाडू दुर्लक्षित राहिल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

### १२.९६ सेकंदांत रचला विक्रम

पावसामुळे निसरडा झालेला ट्रॅक आणि जपानच्या युमी तनाका व चीनच्या यानी वू यांचे तगडे आव्हान असूनही, ज्योतीने १२.९६ सेकंदांची वेळ नोंदवत चॅम्पियनशिपचा नवा रेकॉर्ड केला. पॅरिस ऑलिम्पिकमधील पराभवावर मात करत तिने आपल्या तंत्रात बदल केला आणि हर्डल क्वीन हे नाव सार्थ ठरवले. तिचे प्रशिक्षक जेम्स हिलियर यांनी तिच्या या कामगिरीचे वर्णन क्लास ॲक्ट असे केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)